
बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के



बीड | बुधवार, दि.२ ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक६१वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३


# आमचे सरकार विकासासाठी वचनबद्ध

अजित पवार: परळीमध्ये जनसंवाद यात्रा



## मला टार्गेट केलं जातं आहे : धनंजय मुंडे

विकासाच्या मुद्द्यावर आपण दादांच्या निर्णयाला साथ दिली, दादांच्या बोटाला धरून मी पक्षात आलो. जिथे एक पंचायत समिती सदस्य नव्हता त्या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ९०% यश मिळवून दिले. मात्र दादांच्या नेतृत्वात आम्ही न्यायाची साथ स्वीकारल्यापासून मला जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातं आहे. मात्र मला टार्गेट करणाऱ्यांना माझ्या परळीची जनता मतपेटीतून उत्तर देईल, असे मत मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध योजना व महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण होत आहेत. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे त्याच अनुषंगाने दादांच्या आशीर्वादाने व नेतृत्वाखाली काम करताना बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कुठेही निधीची आपल्याला कमतरता नाही. बीड जिल्ह्यासाठी दादांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे व अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प मंजूर झालेले आहेत. दादांचा वादा हा पक्का आहे त्यामुळे दादांना येणाऱ्या काळात पाठबळ देण्याचा वादाही आपल्याला निश्चित करावा लागेल, त्या दृष्टीने सर्वांनी आपले आशीर्वाद दादांच्या मागे उभे करावेत असे आवाहन यावेळी ना धनंजय मुंडे यांनी केले.

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

समाजातील सर्व समाज घटकांचा सर्वांगीण, सर्वसमावेशक, समतोल विकास करण्यासाठी महायुतीचे हे सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी परळी येथे दिली. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर व नोव्हेंबर चे पैसे बहिणींच्या खात्यात १० ऑक्टोबर पर्यंत देणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी परळी येथील जन सन्मान यात्रेत केली. तर धनंजय मुंडे यांच्यावर २०२४ नंतर मोठी जबाबदारी असणार आहे असे संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यावेळी बोलताना दिले अजित दादांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कोणतीच कमतरता नसल्याने बीड जिल्ह्याचा सर्वंकष विकास निश्चित करू अशी ग्वाही पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या जनसन्मान यात्रेचे आयोजन परळी शहरात करण्यात आले होते. लाडक्याचौकट पान २ वर...


# १६ कोटी ९६ लाखाच्या रस्ता कामांचे उदघाटन : आ. पवार!

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तालुक्यातील मादळमोही ते शहाजानपुर , रा.म.मा ६१ ते खडकी मनकापुर प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.म.मा.६१ तळेवाडी,ते वडगावढोक, तर २०,२३,२४ अर्थसंकल्प योजनेंतर्गत तळेवाडी ते माजलगांव रोड रस्ता कामांचे आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रयत्नातून मंजुर झालेल्या रस्ता कामांचे आज २ ऑक्टोबर रोजी सकाळी ११:०० वाजता तळेवाडी येथे



उद्घाटन करण्यात येणार आहे तरी सर्व ग्रामस्थांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे पान २ वर...




# बदनामी करुन जीवघेणा हल्ला

आंदोलन : ओबीसी संघर्ष समितीची कारवाईची मागणी




तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

ओबीसी संघर्षयोध्दे प्रा.लक्ष्मण हाके सर यांची काही जातीयवादी लोकांनी कट रचून बदनामी केली व त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न सोमवारी सायंकाळी पुणे झाला असून या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी गेवराई तालुका ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. ओबीसी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी या निंदनीय घटनेचा निषेध व्यक्त करून गेवराई पोलिसांमार्फत पोलिस अधीक्षक बीड यांना निवेदन दिले आहे.

सोमवार दि.३० सप्टेंबर रोजी सायंकाळी पुण्यामध्ये ज्याप्रकारे ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके सर यांच्यावर पाळत ठेवून मराठा समाजातील विकृत बुद्धीच्या काही युवकांनी झुंडशाही करून हाके सर यांनी मद्यप्राशन केले असा बनाव केला आणि त्यांना मारहाण देखील केली. तसेच बनावट व्हिडिओ तयार करून सगळीकडे व्हायरल करत बदनामी केली. द्वेशापोटी खोटे आरोप करून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांच्या दोन्ही हाताला व पाठीमागून मानेला दाबून घोर अन्याय करत मारहाण केली. ज्या पध्दतीने मराठा समाजाच्या झुंडशाही करणाऱ्या युवकांनी पोलिस प्रशासनाला न घाबरता अरेरावीची भाषा वापरून दादागिरी केली त्या कृत्याचा गेवराई तालुका ओबीसी संघर्ष समितीच्या वतीने निषेध व्यक्त करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच ओबीसी पान २ वर...

# आंबेडकरी जनतेचे खा. सोनवणेंना निवेदन

मागणी: बीड रेल्वेच्या नामकरणाचा प्रश्न सोडवा




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड रेल्वे स्टेशनला आंबेडकरी जनतेने भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव दिले आहे. सदरील नावाची नोंद घेण्यासंदर्भात केंद्रामध्ये आवाज उठवावा, अशा मागणीचे निवेदन आंबेडकरी जनतेने बीडचे खा. बजरंग सोनवणे यांना मंगळवार (दि.१) ऑक्टोबर रोजी दिले. आंबेडकरी जनतेने खा. बजरंग सोनवणे यांची बीड जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन सदरील मागण्यांचं निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, बीडच्या रेल्वे स्टेशनला भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात आले असून या नावाला कोणाचाही विरोध नाही. सर्व पक्ष, संघटना आणि जाती-धर्माचे लोक सोबत आहेत. त्यामुळे केंद्रात संबंधित विभागाशी चर्चा करून बीडच्या रेल्वे स्टेशनला पान २ वर...

निवेदन | अन्यथा तीव्र आंदोलन करणार

# अक्षय मुंदडा यांचे नाव हटवा !

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

आंबेजोगाई येथील रिंग रोडवर असलेल्या, हिंदुस्तानचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकाच्या पाठीवरच छत्रपती राजांच्या फोटो समोर सौजन्य अक्षय मुंदडा मित्र मंडळ असे नाव असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटो समोर वरील नाव असल्याने, शिवभक्तांच्या भावना दुखावल्याने व शिवरायांचा अवमान झाल्याने तात्काळ अक्षय मुंदडा मित्र मंडळाचे नाव खोडून काढावे, अशा आशयाचे निवेदन, उपजिल्हाधिकारी कार्यालय आंबेजोगाई यांना आंबेजोगाई तालुक्यातील शिवभक्तांनी



दिलेले आहे. तात्काळ सदरील मित्रमंडळाचे नाव हटवल्यास सर्व छत्रपतींचे मावळे मिळून, तीव्र अशा आंदोलनाचा इशारा या निवेदनात त्यांनी दिला आहे.

या निवेदनावर शरदचंद्रजी पवार पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्ष सौ संजीवनी ताई देशमुख, शिवसेनेचे मदनलाल परदेशी, श्री कल्याण भिसे, सचिन पाटील, अशोकष गाढवे, प्रवीण गंगणे, मदनलाल परदेशी, सुंदर अवताडे, शेख हुसेन ,विलासराव काळुंखे, कल्याणराव भगत, गणेश गंगणे,प्रवीण गंगणे, थ सुधाकर शिंदे या व अशा अनेक शिवभक्तांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

खालील मजकूर निवेदनावर आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक रिंग रोड जोगाईवाडी येथे सदरील चौकाचे सुशोभीकरण आम्ही सर्व शिव मावळ्यांनी मिळून केलेले आहे. त्या चौकाला सिमेंटचा ओठा करून, पाठी पान २ वर...




## अधर्मयुद्धाचा अंत?

कर्नल मुस्तफा हकीम (१९५६) इजिप्तमधे पार्सल बॉम्ब स्फोटात मृत्यू, घसन कनाफनी (१९७२) लेबनॉनची राजधानी बैरुत येथे कार बॉम्बमुळे ठार, अब्दुल इ्वाटेर (१९७२) या 'ब्लॅक सप्टेंबर' दहशतवादी संघटनेच्या नेत्याची इटलीत हत्या, फताह या दहशतवादी संघटनेच्या हुसेन बशीर (१९७३) याची सायप्रसमधे हत्या, पॅलेस्टिनी संघटनेचा वादी हदीद (१९७३) याची पूर्व जर्मनीत हत्या, पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशनचा आणि मुख्य म्हणजे म्युनिक ऑलिम्पिक हत्याकांडास जबाबदार दहशतवादी अली हसन (१९७९) हा बैरुतमधील हल्ल्यात ठार, यासर अराफात यांचा उजवा हात अबू जिहाद (१९८८) याची ट्युनिशियाची राजधानी ट्युनिस येथे कुटुंबासमोर गोळ्या घालून हत्या, हेजबोल्लाचा सेक्रेटरी जनरल अब्बास अल मुलावर (१९९२) हा कार बॉम्बच्या स्फोटात ठार, हमास संघटनेचा बॉम्ब निर्माता प्रशिक्षक याह्या अय्याश (१९९६) याचा मोबाइल फोनच्या स्फोटात मस्तक धडापासून वेगळे होऊन मृत्यू, खलीद मशाल (१९९७) हा हमासचा महत्त्वाचा नेता विषबाधेने गतप्राण या यादीत आणखीही इतक्याच नावांची सहज भर घालता येईल आणि त्यात आता हेजबोल्लाचे प्रमुख हसन नसरल्ला आणि अन्य सात-आठ पदाधिकाऱ्यांचाही समावेश करता येईल. ही शेकड्यातील संख्या फक्त इस्रायलने गेल्या सात दशकांत मारलेल्या विविध दहशतवादी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची. यात हमास, पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन, हेजबोल्ला, 'ब्लॅक फ्रायडे', फताह आदी अनेक संघटनांचा समावेश आहे. याखेरीज इस्रायलच्या कारवाईत मारल्या गेलेल्या जनसामान्यांची तर गणतीच नाही. सध्या एकट्या हमासविरोधी कारवाईत ४८ हजारांहून अधिकांचा मृत्यू झालेला आहे. एरवीही जनसामान्यांचे मृत्यू म्हणजे केवळ संख्या. तेव्हा तो मुद्दा सोडून दिला तरी इस्रायलने मारलेल्या विविध दहशतवादी संघटना पदाधिकाऱ्यांची यादीही इतकी प्रचंड आहे. तीवर नजर टाकल्यास काय दिसते?हेच की इस्रायलने आणखी एका दहशतवादी संघटनेच्या आणखी एका म्होरक्यास ठार केले म्हणून स्थानिक परिस्थितीत काडीचाही फरक इतिहासात पडला नाही, वर्तमानात पडत नाही आणि भविष्यातही पडणार नाही. कारण मरायला तयार असणाऱ्यांची संख्या ही ज्यांचा जीव वाचवण्यासाठी हा नरसंहार सुरू आहे त्यांच्यापेक्षा किती तरी अधिक आहे. मरायला तयार असणाऱ्यास मारण्यात काहीही शौर्य नसते. या अशा तयारीनंतर खरोखरच मारल्या गेलेल्यांची संख्या इतकी असतानाही तितक्याच किंवा त्याहूनही अधिक संख्येने नव्याने असे मरणोत्सुक तयार होत असतील तर किमान अक्कल असलेल्यासही आपल्या माणसे मारण्याच्या धोरणात बदल करायला हवा, याची जाणीव होईल. ती व्हायला हवी याचे कारण गेल्या ७० वर्षांत या सनी देओली-छापाच्या निर्बुद्ध राष्ट्रवादाने इस्रायलच्या वाट्यास शांतता आलेली नाही. दंडात बेटकुळ्या आणि तोंडी मर्दुमकीची भाषा यांमुळे फार फार तर दहशत निर्माण होईल. तीदेखील क्षणिक. जगात कोणत्याही प्रदेशात कोणाचीही दहशत अनंत काळ टिकलेली नाही. इस्रायलच्या बाबतही असेच झाले. अमेरिकेच्या पदराआड राहून अन्यांवर डाफरणाऱ्या इस्रायलचा दरारा निर्मितीनंतर काही काळ राहिला. पण नंतर त्यास कोणी घाबरेनासे झाले. आदर्श पालकत्वात पाल्यावर हात उचलणे हा टाळायला हवा असा पर्याय. कारण एकदा का पालक जास्तीत जास्त दोन-चार रट्टे देतील; पण त्यापेक्षा अधिक काहीही करू शकत नाहीत, हे पाल्यास कळले की पोटची पोरेही अधिक निर्ढावल्यासारखी वागतात. इस्रायल आणि आसपासच्या देशांचे संबंध हे असे आता या निर्ढावलेपणाच्या पातळीवर आलेले आहेत.इस्रायल- हमास- हेजबोल्ला आदींबाबतही त्याचीच पुनरावृत्ती होणार याबाबत तिळमात्रही शंका नाही. म्हणजे अशीच माणसे मारणे दोनही बाजूंनी असेच अव्याहत सुरू राहणार. पॅलेस्टिनींस देय असलेल्या भूमीतील वाटा देणे हाच यावरील कायमचा तोडगा. तो मान्य होत नसेल तर जगासमोर कितीही हे धर्मयुद्ध असल्याचा आव आणला तरी प्रत्यक्षात हे 'अधर्मयुद्ध' ठरते आहे हे वास्तव लपणार नाही आणि त्याचा अंत होणार नाही.

# दोन भुरटे पाहू लागले कामकाज!

## बोंबला: सीईओंनी लक्ष देण्याची मागणी

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज पंचायत समितीचा कारभार एक ग्रामसेवक बघत असल्याचे समजले जाते आहे केज पंचायत समितीमध्ये बीडीओचे अधिकारी ग्रामसेवकाला दील्यासारखे झाले आहे कारण बीडीओची अनेक कामे दोन भुरटे ग्रामसेवक पहात असल्याची चर्चा नागरिकांन मध्ये होत आहे तरी सीओ साहेब बीडीओचा कारभार ग्रामसेवकांना देऊन टाका कारण बीडीओची पंचायत समितीला गरज नाही असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.ग्रामसेवकांच्या हातातुन पंचायत समिती सोडवणार का सीओ साहेब असे सुध्दा नागरिकांना मधुन बोलले जात आहे. जर पंचायत समितीचा कारभार एका बीडीओ कडे आहे तर मग केज पंचायत समितीच्या बीडीओ काय शेंगा हानायला गटविकास अधिकारी आहेत का?केज पंचायत समिती मध्ये एक ग्रामसेवक असणारा व्यक्ती बीडीओची लॉगीन आयडी वापरतो तसेच त्यांच्या मनावर जनतेची कामे करतो तसेच एखाद्या कामासाठी चंदा दीला नाही तर त्याचे काम अडविले जाते एका ग्रामसेवकाचा एवढा रुबाब वाढला आहे की केज पंचायत समितीचा गटविकास अधिकारी पदाचा पदभार त्या ग्रामसेवका कडे दीला तरी काही हरकत नाही कारण बीडीओ मॅडम पन असुन वळीबा नसुन खोळबा असल्या सारखे झाले आहे तसेच तो ग्रामसेवक टक्केवारी घेऊन एखाद्या कामाची रक्कम जमा करतो जर टक्केवारी दीली नाही तर त्या कामाची रक्कम सोडत नाही तरी एका भुरट्या ग्रामसेवकाचा मनमानी कारभार



बंद करण्यात यावा नव्हे तर बीडीओ मॅडम यांनी गटविकास अधिकारी पदाचा राजीनामा द्यावा कारण एक ग्रामसेवक बीडीओची लॉगीन आयडी वापरतो म्हणजे पंचायत समितीला बिडीओची गरज नाही तरी सीओ साहेबांनी पंचायत समितीचा कारभार ग्रामसेवकांच्या हातात द्यावा असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

# दोन तास चर्चेची खलबत्ते



घोसला:पुण्यभूमी प्रतिनिधी सिल्लोड-सोयगाव विधानसभा मतदार संघ महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार गट,) कडे सोडण्याच्या मागणी साठी सोयगावचे राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) गटाचे जेष्ठनेते रंगनाथ काळे यांनी रविवारी पक्षाचे शरद पवार यांची भेट घेवून दोन तास राजकीय चर्चा केली यावेळी सिल्लोड-सोयगाव मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार गटाकडे,,) सोडावी अशी गळ घातली यावेळी पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी आश्वासन दिले त्यामुळे राजकिय गोटात खळबळ उडाली आहे

सिल्लोड-सोयगाव मतदार संघातून सोयगावचे रंगनाथ काळे यांनी शरदचंद्र पवार यांच्या निवासस्थानी त्यांची भेट घेवून १९९५ मध्ये काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस युतीतून विधानसभा निवडणूक लढविल्या नंतर पुन्हा सोयगाव सिल्लोड मध्ये पक्षस्थिती बळकट झाली आहे असे रंगनाथ काळे यांनी शरदचंद्र पवार यांना सांगून सोयगाव-सिल्लोड विधानसभा मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेस कडे सोडा अशी आग्रही मागणी धरली यावेळी पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आश्वासन दिल्या मुळे राजकीय गोटात खळबळ उडाली आहे.

# योगदान नसतांना सत्कार कशामुळे?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

युती सरकारने ब्राम्हण समाजाला परशुराम आर्थिक विकास महामंडळ देण्याची घोषणा केली. घोषणा झाली व ब्राम्हण समाजासाठी कोणतेच योगदान नसलेल्या आ. मुंदडांनी स्वतःच्या बगलबच्याकडून सत्कार करुन घेतला. देशपांडे गल्लीतल्या ज्या देवघरात मुंदडानी सत्कार करुन घेतला त्या देवघरासाठी मुंदडानी आजपर्यंत काहीही केले नाही. १९९० पासून जे लोक मतदान करायचे त्या लोकांच्या मंदीरात शेठ फक्त कार्यक्रमात आपल्या बगलबच्याना घेऊन जेवायला यायचे. धार्मिक कार्यक्रमात सोबत माणसं घेऊन जेवायला यायचे व निघून जायचे येवढेच काम यांनी केले. ज्या दासोपंत संशोधन मंडळात सत्कार करुन घेतला त्याचे सभागृहासाठी जो फंड दिला तो मा. आमदार पृथ्वीराज साठे व माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



यांनी. सभागृहाच्या भिंतीवर जयदत्त अण्णा क्षीरसागर व पृथ्वीराज साठे यांच्या फंडातून काम झाल्याचा फलक आहे. या देवस्थानात मुंदडानी एक रुपयाची उदबत्ती दिली नाही. महाराष्ट्रातील थोर संत दासोपंत यांच्या पासोडीच्या प्रती पृथ्वीराज साठे यांनी छापून दिल्या. पण हिंदुत्ववादी पक्षाकडून निवडून येणा-या प्रचंड संपत्ती कमावणा-या शेठला ह्या मंदिराचा विसर पडला.मौलारीच्या डोंगराचा विकास करण्यासाठी निधी देणा-या शेठला दासोपंतांच्या समाधीच्या परिसरात विकास करावा असे का वाटले नाही ? सेक्युलर मानल्या जाणाऱ्या पक्षाचे पुढारी देवस्थानला मदत करतात पण हिंदुत्ववादी मतांवर निवडून आलेल्या मुंदडाला फक्त जेवायला येण्यापुरतं मंदिर आठवतं. ज्या देवेंद्र फडणवीस यांनी परशुराम आर्थिक महामंडळ साठी प्रयत्न केले त्या फडणवीसांवर व पत्नीवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करणारे काही विकृत लोक मुंदडाच्या टीममध्ये आहेत. मग असे लोक सांभाळायचे व फडणवीसांच्या कामाचे श्रेय घेऊन देवघराच्या पवित्र जागेत बगलबच्यांकडून सत्कार करुन घेताना जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगायला पाहिजे. जनतेने विचार करावा यांना सत्कार करुन घेण्याचा अधिकार आहे असे चर्चा सत्र मतदार संघात सुरू झाले आहे.

## पान एक वरून

**बीडमध्ये रिपाइंचा सत्कार...**व सत्कार सोहळ्यात बीड शहरातील वाल्मिकी समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने सामील होऊन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या पाठीशी वाल्मिकी समाजाची ताकद उभी करावी. असे आवाहन नरेश पिव्हाळ, सतपाल लाहोट, भारत पिव्हाळ, शुभम डूलगच, सुरज डुलगच, लखन पिव्हाळ, तिलक दिघानिया, मनू लाहोट, श्याम सीरसवाले, नक्की सागर, करण पिव्हाळ आदींनी केले आहे.

**कवडगाव झेडपी शालेय...** मांजरे. ग्रा.पं.सदस्य सतीष सोनवणे ग्रा.पं.सदस्य दगडू कानडे. ग्रा.पं.सदस्य अनिल नांदुरकर ग्रा.पं. सदस्य नवनाथ करे. मा.जी. सरपंच फेरोज पठाण. अन्वर पठाण. आदन पठाण.रावसाहेब राऊत. बबन लवटे. पिनू डोंबाळे. संजय राऊत. आदेश नांदुरकर. सुनील चौरे.दत्ता चौरे.आबा खरात. गोविंदराव खरात सह विद्यार्थ्यांच्या पालकां समोर ही प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पाडण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक किरण बडे सर.सुनील ठोंबरे सर अजीम पठाण सर बाजीराव शिंदे सर संजय खाडे सर प्रफुल्ल टकले सरसह सर्व स्टाफनी शांततेच्या वातावरणात ही प्रक्रिया पार पाडली. यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्षासह सर्व सदस्यांचे सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच ही पूर्ण प्रक्रिया शांततेत पार पाडल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक बडे सर यांनी गावकऱ्यांचे आभार मानले.

**बस-दुचाकीच्या अपघातात...**गंभीर जखमी होऊन संदीपचा जागीच मृत्यू झाला या अपघाताची माहिती मिळतात अंभोरा पोलीस ठाण्याचे अंमलदार शिवदास केदार, मुकुंद एकशिंगे या कर्मचाऱ्यांनी त्वरीत घटनास्थळी धाव घेऊन रस्त्यावर झालेली वाहतुकीची कोंडी दूर करुन मृतदेह कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी दाखल केला.

**राज्यात रिपाइं मजबूत....**अध्यक्ष मा. सचिनभाऊ खरात, जिल्हा संपर्क प्रमुख मा.रोहित आव्हाड, युवा जिल्हा संपर्क प्रमुख मा.विलास कांबळे, अहमदनगर जिल्हा अध्यक्ष उत्तर मा. अमोन शिंदे तसेच प्रदीप मकासरे, रॉकी लोंढे, हरिष आल्हाट, दिनेश पंडित, जॉन पाटोळे, संदिप वाघमारे, दादा घोडके, परशुराम घोडके, भगवान गजरमल, युवराज शिंदे, युवराज शिंदे, राहुल छत्तीसे, करण चव्हाण, अजित भोसले, कमलाकर आल्हाट, अक्षय लगाडे, वैभव रणसिंग, विवेक घोडके आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येनेतसेच मेळाव्याचे प्रमुख पाहुणे शेलार यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, आजपर्यंतच्या राजकीय क्षेत्रात आंबेडकरी समुदायाचा खूप मोठा वाटा राहिलेला आहे आणि मेळाव्याच्या नावाप्रमाणेच नक्कीच येत्या काळात सत्ता परिवर्तनातही रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (-) व सर्वच आंबेडकरी विचारधारेतील समूहांचा मोठा वाटा असणार आहे हे नमूद केले.या मेळाव्याला मोलाची साथ लाभलेले मा. सचिनजी घोडके, मा. नानासाहेब सांगळे, मा. नितीनजी जावळे या मान्यवरांचा मा. दिपकभाऊ निकाळजे यांच्या हातून सत्कार करण्यात आला. आणि या कार्यक्रमाचे आयोजक अ.नगर दक्षिण जिल्हाध्यक्ष मा.निलेशभाऊ गायकवाड हे होते.

**गेवराई वकील संघाच्या....**निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून त्यांनी पार पाडली तसेच दूपारी तिन वाजता या पदाची मतांची मोजणी करूण घोषणा करण्यात आली तसेच विधिज्ञ अमित मुळे यांनी चौथ्यांदा या निवडणूकीमध्ये ते अध्यक्ष झाले असल्याने नुतन पदअधिकारी यांचे सर्व स्तरावरून अभिनंदन केले जात आहे.

**बीड विकासाचा ...**गळचेपी केली आहे. म्हणूनच आज बीड मतदार संघात क्षीरसागर मुक्तीचा सूर उमठला आहे. माणुसकीचा खरा चेहरा म्हणून जिल्हाप्रमुख अनिलदादा यांची ओळख बीड मतदार संघात आहे. राजकारणाच्या मापदंडात राहून अनिलदादांनी समाजसेवेचा तप केला आहे म्हणूनच आजच्या तिथीला गाव, वस्ती, वाडा तांड्यावरून लहानपासून ते थोरापर्यंतची माणसं अनिलदादा यंदा तुम्ही आमदार व्हा अशी आर्तहाक देत मानतील इच्छा व्यक्त करत आहेत. त्यामुळे अनिलदादा यांना विकासाच्या भूल थापा मारून स्वघोषित विकासपुरुष म्हणून मिरवणाऱ्या जयदत्त क्षीरसागर यांचे व राजकीय फायद्यापोटी घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचे अनुकरण करण्याची गरज नाही. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बीडमध्ये साकार होत असलेली होम मिनिस्टर खेळ पैठणीचा ही स्पर्धा केवळ महिला भगिनींच्या मनोरंजनासाठी आयोजित केली आहे. यामधून अनिलदादा जगताप यांना कुठलीही स्वतःची राजकीय प्रसिद्धी करून घ्यायची नाही व त्याची अनिलदादांना गरज सुद्धा नाही. यामुळे साहजिकच बीड मतदार संघात स्वतःच्या राजकीय फायदा बघून वार्डनिहाय आयोजित केलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेचे अनुकरण अनिलदादांना करायचेच नाही याची नोंद जयश्रीताईंनी घ्यावी अशा शब्दात शिवसेना जिल्हा समन्वयक दीपक काळे यांनी जयश्रीताई विधाते यांनी केलेल्या टिकेचा समाचार घेतला आहे.

## पान सहा वरून

**आमचे सरकार विकासासाठी** बहिणींच्या सशक्तिकरणाच्या दृष्टीने तसेच परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींशी व नागरिकांशी ना.अजितदादा पवार यांसह प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी संवाद साधला. शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानात अभूतपूर्व सभा झाली.तत्पूर्वी भव्य स्वागत मिरवून काढण्यात आली होती. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सांगितले की,आम्ही लोकांना वाऱ्यावर सोडत नाही.आपल्याला विकास साधायचा असेल तर बीड-परभणीमध्ये विमानतळ होणं अत्यावश्यक आहे.. तरच एमआयडीसी, कारखानदारी येईल.रोजगार निर्मिती होईल. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वांना न्याय देण्याची भूमिका घेणारा पक्ष आहे.आँक्टोबर व नोहेबरचे लाडकी बहिण योजनेचे पैसे आम्ही १० आँक्टोबर पर्यंत देणार आहोत. है पैसे स्वतः साठी वापरा, महिलांनी सन्मानांनी राहावे यासाठीच ही योजना आणली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.बीड जिल्ह्यातील जनता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांवर प्रेम करते. माझे बीड जिल्ह्यावर प्रेम, परळीकरांवर विशेष प्रेम आहे. तालुक्यातील वडखेल येथे लवकरच सिताफळ इस्टेट उभी करणार आहोत, जिरेवाडी येथे शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी व्यवस्थापन महाविद्यालयाला मंजुरी दिली आहे. शासनाच्या योजना तुमच्या पर्यंत पोहचवण्यासाठी जन सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या योजनांच्या माध्यमातूनमहिलांना सक्षम, आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न आहे. १० व्या अर्थसंकल्पात महिलांना समोर ठेवून योजना ठरवण्यात आल्या. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेवर ४६ हजार कोटी रुपये खर्च करत आहोत. केंद्रातील सरकार आपल्या विचारांचे असल्याने आम्ही म्हटल्या बरोबर कांदा निर्यातीवरील बंदी उठवली आहे. हे सरकार सर्वांगीण व समतोल विकास साधणारे सरकार असून विरोधकांच्या भुलतापाला बळी न पडता व सर्व लाभार्थ्यांना दिलेले सर्व लाभ कायमस्वरूपी ठेवण्यासाठी महायुती सरकारच्या पाठीशी खंबीरपणाने उभे रहा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.या मेळाव्यास उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आ.विक्रम काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर चव्हाण, कल्याणराव आखाडे, अजय मुंडे, वाल्मिक अण्णा कराड, राजकिशोर मोदी, युवतीच्या प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे, दत्ता पाटील, गोविंदराव देशमुख, फारूक पटेल, बाजीराव धर्माधिकारी, राजाभाऊ औताडे, वैजनाथराव सोळंके, युवकांचे जिल्हाध्यक्ष सुशांत पवार, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्रज्ञाताई खोसरे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष अजिंक्य अनेराव, युवतीच्या प्रिया डोईफोडे, यांसह पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

**धनंजय मुंडेंना २०२४ नंतर मोठी जबाबदारी:सुनील तटकरे :** कृषीमंत्री धनंजय मुंडेंना २०२४ नंतर मोठी जबाबदारी देवू असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष जयंत तटकरे यांनी केले.धनंजय मुंडे तुम्ही परळी पुरते नेते नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्राचे नेते आहात, गोपीनाथ मुंडे नंतर विरोधी पक्षनेता कसा असावा हे धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्राला दाखवले .आगामी विधानसभा निवडणुकीत फॉर्म भरायला धनंजय मुंडे येतील बाकी पूर्ण वेळ राज्यभरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराची जिम्मेदारी त्यांच्यावर असेल. आयोजन नियोजन आणि जन संघटन याचे मोठ्या कौशल्य धनंजय मुंडे यांच्याकडे आहे ते एक प्रकारे शो मॅन असल्याचे गौरवोद्गार सुनील तटकरे यांनी यावेळी काढले.

**अक्षराताईचा सत्कार अन दादा म्हणाले :** दरम्यान लाडक्या बहिण योजनेचा लाभ घेऊन त्या रक्कमेतून स्वतः चा सजावट वस्तू तयार करण्याचा व्यवसाय सुरू केलेल्या परळीतील अक्षराताई शिंदे या तरुणीचा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अक्षराताईने स्वतःच्या हाताने बनवलेल्या सजावटीच्या वटवृक्षाची भेट अजितदादाना दिली, मात्र दादांनी ताई, तू हे विकायला तयार केलेस ना? मग किती रुपयांना विकतेस? असा प्रश्न अक्षराला करताच, अक्षराने दीडशे रुपये सांगितले. त्याबरोबर दादांनी आपल्या कर्मचाऱ्याला जवळ बोलावून, ताईला दिडशे रुपये दे रे... असा आदेशच दिला!

**बदनामी करुन जीवघेणा...**संघर्षयोध्दे प्रा.लक्ष्मण हाके सर व नवनाथ आबा वाघमारे यांच्या जिवीताला धोका असून त्यांना शासनाने तात्काळ झेड प्लस सुरक्षा द्यावी अशी मागणी देखील करण्यात आली आहे. आठ दिवसांत वरील मागण्यांची दखल घेतली नाही तर महाराष्ट्रात कायदेशीर मार्गाने तीव्र आंदलने करण्यात येतील असा इशारा देखील या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर प्रा.पी.टी.चव्हाण, प्रा.गणपत काकडे, परमेश्वर महाराज वाघमोडे, अंबादास बाबा पिसाळ, सुघोष मुंढे, बापू गाडेकर, मयुरीताई बाळासाहेब खेडकर-मस्के, दादासाहेब चौधरी, राजाभाऊ विटकर, संतोष शेजूळ, गजानन काळे, बाबासाहेब घोडके, सरपंच लहानू वाघमोडे, भरत खटके, सुनिल ढाकणे, राम बाबुराव शेंडगे, संग्राम सानप, महादेव काळे यांच्यासह ओबीसी समाज बांधवांच्या सह्या आहेत.

**१६ कोटी ९६ लाखाच्या रस्ता**...असे आवाहन करण्यात आले आहे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत तसे अर्थसंकल्प योजनेंतर्गत गेवराई तालुक्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मादळमोही ते शहाजनपुर ५/६०० कि.मी.४ कोटी १२ लक्ष ३५ हाजार रूपये निधीचा रस्ता, रा.म.मा.६१ खडकी,मनकापुर रस्ता ५/५०० ३ कोटी ९२ लक्ष ९ हाजार रूपये किमंतीच्या रस्ता,प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रा.म.मा ६१ तळेवाडी ते वडगावढोक ३/५०० कि.मी. ४ कोटी ९२ लक्ष ३४ हाजार रूपये निधीच्या रस्ता, अर्थसंकल्प २०,२३,२४, योजनेंतर्गत गेवराई विधानसभा मतदारसंघातील रस्ता कामांचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

**आंबेडकरी जनतेचे खा.बजरंग**...बाबासाहेबांचे नाव देण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी मागणी आंबेडकरी जनतेने खा. बजरंग सोनवणे यांच्याकडे केली. दरम्यान निवेदन स्वीकारताना खा. बजरंग सोनवणे म्हणाले की, आपण दिल्लीत पोहोचल्यानंतर संबंधित विभागाला या संदर्भात निवेदन दिले जाईल. त्यानंतर आपल्याशी कळवू असा शब्द खा. बजरंग सोनवणे यांनी आंबेडकरी जनतेला दिला. तत्पूर्वी आंबेडकरी जनतेकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे दुपारी १ वाजता महत्त्वपूर्ण बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत येत्या ९ ऑक्टोबरला रास्ता रोको आंदोलन करून नामकरण संदर्भात मागणी केली जाणार आहे. सदरील रास्ता रोको बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी केला जाणार आहे. तशा मागणीचे निवेदन देखील बीड जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना आंबेडकरी जनतेने दिले आहे.

**अक्षय मुंदडा यांचे**...लावून, त्यावर मोठ्या अक्षरात छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नाव टाकले आहे. व त्याच बोर्डावर छत्रपती शिवाजी महाराजांचे फोटो पण काढलेला आहे. परंतु केज विधानसभेच्या आमदार नमिता यांचे पती अक्षय मुंदडा यांचे नाव सदरील पाठीवर अक्षय मुंदडा मित्र मंडळ म्हणून खोडसाळ प्रवृत्तीने नाव टाकले आहे. यावर काही दिवसापूर्वी छत्रपतीच्या मावळ्याने आवाज उठवला होता. की, ते नाव काढून टाका. परंतु सदरील आमदारांनी त्यांचे राजकीय वजन वापरून छत्रपतींच्या मावळ्यावरच खोटी प्रतिबंधात्मक कारवाई केली. सदरील चौकाच्या पाठीवर आमचे महाराष्ट्राची व सर्व हिंदुस्तानचे अस्मिता हे छत्रपती शिवाजी महाराज आहेत. त्यामुळे सदरील चौकाचे पाठीवरील राजकीय नेत्याचे मंडळाचे नाव, तात्काळ पुसून टाकून, आमच्या तमाम हिंदुस्तानच्या दैवताचा होत असलेला अवमान, तात्काळ थांबवावा ही विनंती. अन्यथा आम्ही सर्व छत्रपतींचे मावळे म्हणून आंदोलन करणार आहोत अशा आशयाचे निवेदन शिवभक्तांनी उपजिल्हाधिकारी कार्यालय आंबेजोगाई यांना देण्यात आलेले आहे.

**मागासवर्गीयांनो तुमचा...** अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी प्राप्त होऊन देखील जाणीवपूर्वक अनुसूचित जातींच्या वस्त्यांचे अहित करून व्यापाऱ्यांचे हित लक्षात घेत एकूण राखीव ६ प्रभागा पैकी केवळ प्रभाग क्र २ या एकाच प्रभागा मधील योजने अंतर्गत घेण्यात आलेली कामे ही अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांना सामूहिक लाभ होईल अशी सार्वजनिक हिताची व आवश्यक नाहीत तरी देखील अनुक्रमे ३ कामांना ४ कोटी २० लाख रुपये इतका निधी मिळावा या करिता जिल्हा प्रशासन बीड यांच्याकडे नियम बाह्ययपणे प्रस्ताव पाठवला आणि त्यास जिल्हा प्रशासनानेदेखील बेकादेशीर रित्या संदर्भ क्र २ नुसार प्रशासकीय मान्यता दिली असल्याने अनुसूचित जातींच्या इतर प्रभागावर तसेच समाज बांधवांवर अन्याय होत आहे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीतील लोकसंख्येच्या निकषानुसार आर्थिक मर्यादित,( योजनेचे निकष या अंतर्गत दर्शविल्याप्रमाणे ) कामे मंजूर करण्यात आलेली नाहीत इतर ५ अनुसूचित जाती राखीव प्रभागातील प्रस्ताव पाठविण्यास नगर परिषद बीड यांनी जातीय द्वेषातून टाळाटाळ केली असल्याचे जाणवते तसेच जिल्हा प्रशासन बीड यांनी प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब करत असून बीड नगर परिषद प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत असल्याचे प्रकर्षाने जाणवते येणाऱ्या काही दिवसात विधानसभा निवडणूकिची आदर्श आचार संहिता जाहीर होऊ शकते अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे तरी देखील अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागातील विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात नगरपरिषद बीड व जिल्हा प्रशासन बीड यांचेकडून अद्यापर्यंत कसल्याही प्रकारची प्रक्रिया पूर्ण केली जात नाही ही मोठी शोकांतिका आहे असे की, आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीची आदर्श आचार संहिता केंव्हाही घोषित होऊ शकते आचार संहिता लागल्यास सदरील ५ प्रभागात विकास कामे करता येणार नाहीत तसेच विकास कामांना विलंब होऊन राखीव प्रभागावर अन्याय होऊन राखीव प्रभाग विकासापासून दूर राहील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत मंजूर निधीच्या अनुषंगाने व्यापाऱ्यांच्या हितासाठी अनुसूचित जाती राखीव ६ प्रभागा पैकी केवळ प्रभाग क्र २ मधील नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) अंतर्गत बीड नगरपरिषद डीपी रस्त्यांची सिमेंट काँक्रेट रस्ते व पक्की नाली बांधकाम करून सुधारणा करणे साठी (१७) कामे प्रस्तावित केली असून शासनाकडे नगर परिषद बीड यांनी सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याचे समजते त्याच १७ कामातील अनुक्रमें जालना रोड ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत सिमेंट रस्ता करणे बाबत च्या प्रस्तावित कामांच्या नावात बीड येथील प्रभाग क्रमांक २ मधील शिव शारदा बिल्डिंग ( जालना रोड ) ते जिजामाता चौकपर्यंत सीसी रस्ता करणे.बीड येथील प्रभाग क्रमांक २ मधील चंपावती हार्डवेअर ते जालनेकर ट्रेडर्स पर्यंत सीसी रस्ता करणे. बीड येथील प्रभाग क्रमांक २ मधील संत सावता माळी चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत सीसी रस्ता करणे असा बदल करत एकच काम तीन भागात विभागत नियमबहाय्य प्रशासकीय मान्यता देऊन अनुसूचित जातींच्या इतर ५ राखीव प्रभागावर जाणीव पूर्वक अन्याय करणाऱ्या नगर परिषद बीड व जिल्हाप्रशासन बीड यांच्या गैर कारभाराची चौकशी करून कठोर कार्यवाही करण्यात यावी तसेच व्यापाऱ्यांच्या हितासाठी अनुसूचित जाती राखीव ६ प्रभागा पैकी केवळ प्रभाग क्र २ मधील कामांना नियमबहाय्य देण्यात आलेली अन्यायकारक प्रशासकीय मान्यता व निविदा प्रक्रिया रद्दबाद करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांचेकडे भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक /अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी निवेदनातुन केली आहे तसेच न्याय न मिळाल्यास मा.उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल असा इशारा ही भिम स्वराज्य सेनेचे संस्थापक/अध्यक्ष तथा नगरसेवक ड विकास जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# डिजिटल तंत्रज्ञानामुळे गुणवत्ता वाढेल

## आशिष येरेकर — जिल्हा परिषद शाळांना टॅब व स्मार्ट टिव्हीचे वितरण

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी आधुनिक शिक्षण पध्दतीत डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे, शहरांप्रमाणे ग्रामीण भागातही विद्यार्थ्यांना या नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी जिल्हा परिषद विशेष प्रयत्न करीत आहे. जिल्ह्यात मिशन आपुलकी राबवून शाळांचा भौतिक विकास तसेच गुणवत्ता वाढवली जात आहे. इन्फोसिस स्प्रींग बोर्ड फाऊंडेशनने जिल्हा परिषदेच्या ७० शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी १४०० टॅब व ५० शाळांना १०० स्मार्ट टिव्ही उपलब्ध करून दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण मिळवून शैक्षणिक गुणवत्ता वाढ होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी केले.




अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मिशन आपुलकी अंतर्गत इन्फोसिस स्प्रींग बोर्ड फाऊंडेशनच्यावतीने जिल्हा परिषद शाळांना टॅब व स्मार्ट टिव्ही देण्यात येत आहे. याअंतर्गत संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना आशिष येरेकर यांच्या हस्ते टॅबचे वितरण करण्यात आले. यावेळी इन्फोसिसचे संतोष आनंथपुरा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी राजश्री घोडके, लेखाधिकारी रमेश कासार आदी उपस्थित होते.आनंथपुरा म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी सामाजिक बांधिलकीतून कंपनीने टॅब वितरण सुरु केले आहे. त्याचा सर्व शाळांनी चांगल्या पध्दतीने उपयोग करावा. कंपनीचे प्रतिनिधी प्रत्यक्ष शाळांना भेट देवून टॅब, स्मार्ट टिव्ही वापराबाबत मार्गदर्शन करणार आहेत.रमेश कासार म्हणाले, सन २०२२ पासून जिल्ह्यात मिशन आपुलकी अभियान सुरु करण्यात आले आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये ३५ कोटींच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सीईओ आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कंपनीकडून डिजिटल साहित्य मिळाले आहे. त्याचा विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या दृष्टीने अतिशय चांगला फायदा होईल. विलास साठे यांनी सूत्रसंचालन केले.

# रनिंग क्रिडा स्पर्धेमध्ये यश



बीड/पुण्यभूमीप्रतिनिधी

सैनिका विद्यालय, नगर रोड, बीड येथे तालुका क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वयोगट १७ मध्ये ४०० व १५०० मी. धावणे मध्ये कर्मयोगीनी सावित्रीबाई फुले विद्यालयातील विद्यार्थीनी कु. ऋतुजा प्रतापराव पिसाळ वर्ग- १० वी या मुलीने घवघवीत यश पटकावले. या विद्यार्थीनीला स्पर्धेसाठी श्री. कृष्णा राठोड सराचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या घवघवीत यशा बदल कुमारी ऋतुजा प्रतापराव पिसाळ या मुलीचे शाळेतील मार्गदर्शक संस्थाध्यक्षा सौ. अंजलीताई शेळके, श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख, विशाल सुपेकर प्रा. मुख्याध्यापक प्रमुख तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक करुन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार




अंबाजोगाई/पुण्यभूमी प्रतिनिधी

ममदापूर (पा)येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका श्रीमती मंगल लोमटे या ३८ वर्ष ज्ञानदानाचे पवित्र कार्य करून वयोमानानुसार सेवा निवृत्त झाल्या.

त्यानिमित्त माकेगाव येथील गावकऱ्यांच्या वतीने त्यांच्या सहकुटुंब सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी मंगल लोमटे यांनी ३८ वर्षाच्या सेवेतील आठवणींना उजाळा दिला. मंगल लोमटे म्हणल्या की शिक्षकाने आपले कार्य निष्ठेने आणि प्रामाणिकपणे केल्यास सर्वोच्च आनंद प्राप्त होतो तोच आनंद आज मला होत आहे. यावेळी सहकारी शिक्षकांनी श्रीमती मंगल लोमटे यांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या व आठवणींना उजाळा दिला.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी बी के नांदुरकर,ज्येष्ठ सहकार नेते तथा आंबा साखर कारखान्याचे माजी चेअरमन अशोकराव देशमुख,श्रीमती हजारे मॅडम,श्री.मणियार,श्रीमती धपाटे,श्री.आवाड व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जेष्ठ व्यापारी चंद्रकांत ससाणेंचे निधन

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी



येथील किराणा मालाचे जेष्ठ व्यापारी चंद्रकांतभाऊ एकनाथ ससाणे यांचे बुधवारी पहाटेच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे (वय-७६) होते.

दिवंगत चंद्रकांतभाऊ ससाणे यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अत्यंत शांत-संयमी व धार्मिक व्यक्तिमत्व म्हणून ससाणे हे परिसरात सुपरिचित होते. कडा येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर बुधवारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी विविध क्षेत्रातील प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखिल भारतीय पेशवा संघटनेची धुरा

## अभिनंदनिय:तालुकाध्यक्षपदी योगेश देवा यांची निवड

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या वडवणी तालुका अध्यक्षपदी तालुक्यातील चिंचाळा येथील धडाडीचे कार्यकर्ते योगेश देवा जोशी चिंचाळकर यांची निवड झाली आहे. या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे. अंबाजोगाई ते दिनांक २९-९-२३रोजी दुपारी २-वाजता अखिल भारतीय पेशवा संघटना नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा नियुक्ती कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला अखिल भारतीय पेशवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन वाडे पाटील हे उपस्थित होते. वाडे पाटील व उपस्थित मान्यवरा यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून आराध्य दैवत श्री भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वाडे पाटील यांच्या हस्ते नवं निर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आले.



यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वाडे पाटील यांनी स्वीकारले,तर प्रमुख पाहुणे क्षीरसागर साहेब हे होते. यावेळी लक्ष्मीकांत दोडके यांच्यासह आदि मान्यवर मंडळी यांची उपस्थिती होती .अखिल भारतीय पेशवा संघटना जिल्हाध्यक्ष म्हणून अंबाजोगाई येथील संजयजी देशपांडे यांची. तर वडवणी तालुका अध्यक्ष म्हणून योगेश जोशी चिंचाळकर यांची निवड करण्यात आली आहे.अध्यक्षीय समारोप करताना संघटना स्थापन कश्या संघर्षतुन झाली यांचे विवेचन केले. वाडे पाटील यांनी तळागाळातील ब्राह्मण समाज बांधवांपर्यंत जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावे असे भावनिक आभार वाडे पाटील यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मिलिंद कुलकर्णी यांनी मांडले. यानंतर माता योगेश्वरी देवीच्या मंदिरात जाऊन सर्वांनी दर्शन घेतले व यानंतर हॉटेल कृष्णाई येथे उपस्थितांना भोजनाचा आस्वाद घेवून कार्यक्रमाची सांगतात करण्यात आली.

# रिपाइं सोहळ्यात दिव्यांग बांधव सामील: सुरेश माने



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भारत सरकारच्या केंद्रीय मंत्री मंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाईच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा होणार आहे.

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केंद्राच्या सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून लाभ मिळवून देण्याचे काम राज्यासह देशपातळीवर करीत आहेत.रामदास आठवले या संघर्षशील नेतृत्वाचा यथोचित सन्मान करण्यासाठी पप्पू कागदे यांनी बीड शहरात सायंकाळी ५ वाजता ऐतिहासिक सत्कार सोहळ्याचे औचित्य साधून शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी दुपारी ३:३० वाजता बीड शहरातील राजुरीवेस ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत भव्य रॅली काढण्यात येणार आहे. रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा विराट करण्यासाठी बीड शहरातील दिव्यांग पुरुष व महिलांनी हजारोच्या संख्येने सामील व्हावे. असे आवाहन दिव्यांग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांनी केले आहे.

# निंभोरा येथे रस्ता खचून खड्डा

## दुर्लक्ष:अपघात होण्याचे प्रमाण वाढले

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

वरठाण ते खडकदेवळा रस्त्याच्या दरम्यान असलेल्या निंभोरा गावाजवळील नलकांडी पुलाचा रस्ता खचून पडलेल्या खड्ड्यात पाचोरा कडून येणारी दुचाकी अडकून दोघे गंभीर झाल्याची घटना मंगळवारी दुपारी चार वाजेच्या सुमारास निंभोरा गावाजवळ घडली रोषन पाटील,बेबाबाई पाटील असे जखमी चे नाव असून वाहन संघर्ष समितीचे प्रवीण वाघ यांचेसह ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमी ना मदत केली आहे.



निभोरा तालुक्यातील निभोरा गावाजवळ असलेल्या हा रस्तामधील नळकांडी पुलावर रस्ता खचून पाईप फुटल्याने मोठा खड्डा पडला हा खड्डा चुकविण्याच्या नादात एक दुचाकी स्लीप झाल्याने मुलगा व आई जखमी झाल्याची घटना घडली आहे दरम्यान पुलावरून वाहतूक ठप्प झाल्या ने पाचोरा आगाराच्या बनोटी कडे धावणाऱ्या बसेस मंगळवारी बंद करण्यात आल्या आहेत त्यामुळे वरठाण, बनोटी, वाडी,पळाशी,घोरकुंड आदी परीसरातील जवळपास दोनशे विद्यार्थी गोदेंगाव येथील सरस्वती भुवन प्रशालेत शिक्षण घेण्यासाठी ये जा करतात परंतु बसच बंद असल्याने ह्या विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान झाले आहे तसेच प्रवाशांची तारांबळ उडाली होती बनोटी-पाचोरा रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली असुन ठीकठीकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत साईटपट्ट्या खोल गेलेल्या आहेत ह्या रस्त्यावर वाहने चालविणे म्हणजे तारेवरची कसरत करण्यासारखे आहे त्यातच रस्ता खराब असल्याने ह्या रस्त्यावर पावसाच्या पाणी साचल्याने जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत असुन काही ठीकाणी नळकांडी पुल बांधण्यात आले आहेत त्या ठिकाणी पाणी शिरल्याने निभोरा गावाजवळील काही अंतरावर असलेल्या नळकांडी पुलाचा रस्ता खचून पाईप फुटला असुन आजुबाजुला दोन खड्डे तर रस्त्याच्या मधोमध भला मोठा खड्डा पडल्याने मुलगा व आई दुचाकीवरून जात असताना खड्डा चुकवित असतांना पडल्याने जखमी झाले आहेत.

# सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण



घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

घोसला येथील गंगानंद गिरी आश्रमात वीस लक्ष रु निधीतून उभारण्यात आलेल्या सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण भाजपचे डॉ संजय गव्हाणे महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पुष्पां काळे चिदानंद महाराज यांच्या हस्ते सोमवारी सायंकाळी सहा वाजता लोकार्पण करण्यात आले यावेळी व्यासपीठावर डॉ संजय गव्हाणे,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष पुष्पां काळे,तालुकाध्यक्ष सुनील जाधव, संजीवन सोनवणे, सुनील गव्हांडे, सरपंच गणेश माळी,मधुकर काटे,चिदानंद महाराज, विक्रम पाटील, प्रदीप बोडखे,संजय पाटील(जरंडी),प्रकाश शेळके,(कन्नड) सुनील जैन आदींची उपस्थिती होती यावेळी मान्यवरांच्या सत्कार समाधान पाटील, किशोर बावस्कर यांनी केला दरम्यान केंद्रीय अर्थ राज्यमंत्री यांच्या निधीतून दहा लक्ष आणि ग्रामविकास मंत्री यांचेकडे पाठपुरावा करून वाढीव दहा लक्ष असा वीस लक्ष निधीचे सांस्कृतिक सभागृहचे लोकार्पण केल्याची घोषणा डॉ संजय गव्हाणे(कन्नड) यांनी केली यावेळी सुधीर कुलकर्णी, सुभाष बावस्कर, कैलास पाटील,शरद महाजन, अशोक महाराज, धोंडू युवरे,धनराज वाघ,विशाल गिरी,गुणवंत पाटील,सोमु तडवी,सुनील पाटील, गणेश गवळी,समाधान बावस्कर, समाधान गव्हांडे, श्रावण युवरे,प्रमोद वाघ,रामदास गवळी,प्रकाश गव्हांडे,पिंटू गव्हांडे, आदींसह ग्रामस्थाची उपस्थिती होती समाधान पाटील,किशोर बावस्कर यांनी पुढाकार घेतला होता.

## सुनील गुट्टे — शेतकरी संवाद यात्रेला प्रतिसाद

# पालकमंत्र्यांनी केवळ मताचा वापर केला

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाच्यावतीने आयोजित व ज्येष्ठ नेत्या सौ सुधामती ताई गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली व युवक नेते सुनील भैया गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली परळी मतदारसंघात होत असलेल्या शेतकरी संवाद यात्रेला तिसऱ्या दिवशी उदंड प्रतिसाद मिळत असून बीड जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी केवळ विकासाच्या मोठमोठ्या गप्पा मारल्या आणि परळी मतदारसंघाचा केवळ मताचा वापर केला असा आरोप शेतकरी संवाद यात्रे दरम्यानयुवानेते सुनील गुट्टे यांनी केला.



परळी मतदारसंघात ही यात्रा तब्बल ९ दिवस ४२३ किलोमीटरचा प्रवास ८६ गावंशी भेटी व दीड लाख नागरिकांशी संवाद साधणार आहे या यात्रेदरम्यान आज मंगळवार १ आक्टोबर रोजी नागपिंपरी मांडेखेल अस्वल आंबा वानटाकळी दौनापूर नागापूर माळहिवरा तडोळी वडखेल सेलु पिंपळगाव गाढे येथील शेतकरी, शेतमजूर व शेतक-यांशी संवाद साधला.या शेतकरी संवाद यात्रेत शेती,स्थानिक प्रश्न अदी अनेक विषयांवर चर्चा करण्यात येत आहे.

या यात्रेच्या मुक्कामा दरम्यान बोधेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेचा प्रश्न मागच्या बारा वर्षापासून असून पालकमंत्री यांच्या नाथ प्रतिष्ठानने २०१२ मध्ये त्या शाळेच्या बिल्डिंगचे भूमिपूजन केले होते पण आज पर्यंत बिल्डिंग तयार झालेली नाही मतदाराचा फक्त मतापुरता वापर करणाऱ्या कृषी मंत्र्यांनी कृषीमंत्र्याच्या मतदार संघात शिक्षण क्षेत्र पूर्णपणे उध्वस्त झाले आहे. या शाळेच्या विषयाकडे युवक नेते सुनील गुट्टे यांनी विशेष लक्ष देऊन प्रशासनाकडे तात्काळ हा प्रश्न मार्गी लावा अशी विनंती केली आहे. या यात्रेदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष देवराव लुगडे महाराज शेतकरी नेते कालिदास दादा पेठ विधानसभा अध्यक्ष किरण काका पवार तालुका कार्याध्यक्ष रमेश ढाकणे तालुका उपाध्यक्ष महारुद्र कदम युवक तालुका संघटक नांदकुमार तोडके अंबाजोगाई तालुका संघटक दत्ताभाऊ शिंदे युवक तालुका उपाध्यक्ष गोविंद देशमुख भटक्या विमुक्त जमाती तालुकाध्यक्ष गणेश देवकते नागापूर युवक सर्कल अध्यक्ष नागनाथ शिंदे विद्यार्थी आघाडी सर्कल अध्यक्ष विजयराव भोसले विद्यार्थी आघाडी तालुका अध्यक्ष पवन कुमार बोडके युवक नेते ईश्वरजीचा सोनवणे हनुमंत बाप्पा सोळंके शिवाजीराव नागरगोजे सुंदर सोळंके, तालुका संघटक बाबासाहेब गव्हाणे,ज्येष्ठ नेते बाबासाहेब गव्हाणे आदी गावकरी उपस्थित होते.

# घाटेवाडी येथे शालेय साहित्याचे वाटप

## आठवणी: वैजनाथ गायकवाडांच्या पुण्यतिथीचा उपक्रम

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील घाटेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये गावातील ज्येष्ठ नागरिक कै. वैजनाथ आप्पा गायकवाड यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी चटई तसेच इतर साहित्य देण्यात आले. पेशाने शिक्षक असलेले श्री बाबुराव वैजनाथ गायकवाड आपल्या वडिलांच्या निधनानंतर प्रत्येक वर्षी त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ आपल्याच गावातील विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे शालेय साहित्याचे वाटप करत असतात. कै. वैजनाथ आप्पा गायकवाड यांचे सुपुत्र श्री बाबुराव गायकवाड हे परभणी जिल्ह्यात प्राथमिक शाळेमध्ये अध्यापनाचे काम करत आहेत. सुरवातीपासूनच ग्रामीण



भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी काहीना काही आपले देणे म्हणून एक चांगले कार्य करीत आहेत. कै. वैजनाथ आप्पा गायकवाड हे गावातील एक आदर्श नागरिक होते. त्यांनी आपल्या जीवनात सामाजिक बांधिलकी जपत चांगले कार्य केले आहे. समाजामध्ये कधी फूट पडू दिली नाही तसेच गावातील तंटा गावातच मिटवणे अशा प्रकारचे अनेक सामाजिक कार्य त्यांनी केले आहे. या प्रसंगी भारत गरबडे, शरद शिंदे, बाबासाहेब गायकवाड यांच्यासह शाळेतील मुख्याध्यापक , शिक्षक वृंद तसेच गावातील अबालवृद्ध उपस्थित होते.

## वेचक

### खेडमधील ३२ बसफेऱ्या आज रद्द

**खेड (प्रतिनिधी) :** खेड बसस्थानकातून ग्रामीण भागासह लांब पल्ल्याच्या मार्गावर मार्गस्थ होणाऱ्या ३२ फेऱ्या १ ऑक्टोबर रोजी रद्द करण्यात येणार आहेत. रायगड जिल्ह्यातील रोहा येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या महिला सशक्तीकरण कार्यक्रमासाठी जादा बसफेऱ्या सोडण्यात येणार असल्याने या बसफेऱ्या बंद करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यासाठी ठिकठिकाणच्या आगारातून जादा बसफेऱ्या रवाना होणार आहेत. ३० सप्टेंबर रोजी येथील आगारातून सुटणाऱ्या ११ बसेस रद्द करण्यात आल्या. यामध्ये खेड-कात्रण वस्ती, खेड-भेलसई वस्ती, खेड-बिजघर वस्ती, खेड-तिसंगी वस्ती, खेड- वाडीजैतापूर वस्ती, खेड-मंडणगड वस्ती, खेड-महाड, खेड-कोल्हापूर, खेड-पुणे, खेड-मुंबई, खेड- पन्हाळजे-मुंबई या बसफेऱ्या रद्द करण्यात आल्या. तर १ ऑक्टोबर रोजी खेड-बिजघर वस्ती, खेड-कात्रण वस्ती, खेड- मंडणगड वस्ती, खेड-भेलसई वस्ती, खेड- कोंडिवली-शिव, खेड-आयनी, खेड-वाडीजैतापूर वस्ती, खेड-कशेडी, खेड- नांदिवली, खेड-महाड वस्ती, खेड-चिपळूण, खेड-तिसंगी, खेड-सुकदर, खेड-किल्ले माची, खेड-शिवतर, खेड-आष्टी, खेड-पोयनार, खेड-पन्हाळजे, खेड-तुळशी आदी बसफेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागातील जनतेची गैरसोय होणार आहे.

### विश्वकर्मा समाज महिला मंडळातर्फे चॉकलेट प्रशिक्षण पार

**खेड (प्रतिनिधी) :** खेड विश्वकर्मा पं. सु. समाज महिला मंडळ यांच्याकडुन चॉकलेट प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. चिटणीस संकुल, पालकर क्लासेस, कोष्ट आळी, खेड येथे हे प्रशिक्षण घेण्यात आले. या कार्यक्रमात ४५ ते ५० महिलांनी व कार्यक्रमात विविध समाजातील महिला यांनी सहभाग नोंदवला होता. प्रशिक्षणार्थी श्रद्धा कदम यांनी चॉकलेटचे विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षणासाठी माणदेशी फाऊंडेशन चिपळूण यांचे मार्गदर्शन लाभले. महिलाध्यक्षा श्रद्धा पालकर आणि मंडळाच्या सर्व सदस्यांनी यासाठी मेहनत घेतली. यावेळी मंडळाच्या महिलाध्यक्षा श्रद्धा पालकर यांच्या हस्ते माधवी पाटणकर, श्रद्धा कदम यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सचिव वनश्री सागवेकर, स्नेहल पालकर, खजिनदार श्रेया सागवेकर यांचे यासाठी सहकार्य लाभल्याबद्दल श्रद्धा पालकर यांनी विशेष आभार मानले. यावेळी केक, मोत्याचे दागिने, बटवे, पर्सेस बनविण्याचा पुढील मानस आपण करणार असल्याचे पालकर यांनी म्हटले. या कार्यक्रमाला उपाध्यक्षा रुचिता सागवेकर, विश्वकर्मा पं. सु. समाज खेड तालुका प्रसिद्धी माध्यमप्रमुख वैभव सागवेकर, शरद पालकर आदि समाज बांधव उपस्थित होते.

### जामगे सैनिकी स्कूलच्या खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**खेड (प्रतिनिधी) :** शिवतेज आरोग्य सेवा संस्था संचलित जामगे येथील छत्रपती संभाजीराजे सैनिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी डेरवण येथे झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती तायक्वाँदो, बॉक्सिंग व बॉल बॅडमिंटन स्पर्धेत पदकांची लयलूट केली. चारही स्पर्धांतील विजेत्या खेळाडूंची विभागीय स्पर्धांसाठी निवड झाली आहे. या चार खेळाडूंनी जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत २ सुवर्णपदके, ६ रौप्य व ३ कांस्य पदके पटकावली. तायक्वाँदो स्पर्धेमध्ये २ सुवर्ण, १ कांस्य पदक मिळवले, बॉक्सिंग स्पर्धेत २० सुवर्ण, १० रौप्य व ७ कांस्य पदके प्राप्त केली. नेटबॉल स्पर्धेत १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील तिन्ही संघांनी द्वितीय क्रमांक पटकावला. बॉल बॅडमिंटन क्रीडा स्पर्धेत १४ व १९ गटात संघाने प्रथम पटकावला. १७ वर्षाखालील संघाने द्वितीय क्रमांक मिळवला. खेळाडूंना क्रीडाशिक्षक सूर्यवंशी, विलास मोरे, हवालदार सचिन मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. शिवतेज आरोग्य संस्थेच्या अध्यक्षा ज्योती कदम, प्राचार्य महादेव खोत, कमांडंट श्रीक्रिशन यांच्यासह संस्था पदाधिकाऱ्यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

# जिल्ह्याला आता नवरात्रौत्सवाचे वेध

## ४८७ ठिकाणी दुर्गामाता मूर्तीची प्रतिष्ठापना

## ९० ठिकाणी होणार प्रतिमा पूजन

**रत्नागिरी (वार्ताहर)**

गणेशोत्सवानंतर जिल्ह्यात सर्वत्र नवरात्रौत्सवाची धूम सुरू होत आहे. गुरुवार ३ ऑक्टोबरपासून शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ होत आहे. या दिवशी जिल्ह्यात घटस्थापनेबरोबरच सार्वजनिक व खासगी मिळून ४८७ ठिकाणी दुर्गामातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना, तर ९० ठिकाणी प्रतिमा पूजन करण्यात येणार आहे. यानिमित्त अनेक ठिकाणी गरब्याचेही आयोजन करण्यात आले आहे. या नऊ दिवसांत जिल्ह्यात दांडिया व गरब्याची 'धूम' अनुभवायला मिळणार असून, यासाठी तरुणाई सज्ज झाली आहे.



कोकणामध्ये पूर्वी ग्रामदेवतांच्या मंदिरांपुरताच घटस्थापना करण्यापर्यंत हा उत्सव मर्यादित होता. मात्र, यामध्ये आता कमालीचा बदल झाला असून, त्यानुसार जिल्ह्यातील पोलीस ठाणे निहाय आकडेवारीनुसार खेड पोलीस ठाणे हद्दीत २७ सार्वजनिक, मंडणगड ४३ सार्वजनिक तर खासगी ३, दापोली सार्वजनिक ३३ तर खासगी १७, दाभोळ सार्वजनिक २ तर खासगी ६, बाणकोट सार्वजनिक ५ तर खासगी ६, देवरुख सार्वजनिक २४ तर खासगी ३, राजापूर सार्वजनिक १२, नाटे सार्वजनिक ८ तर, लांजा सार्वजनिक १६ तर खासगी २, अलोरे - शिरगाव सार्वजनिक १२ तर खासगी १, चिपळूण सार्वजनिक १७, सावर्डे सार्वजनिक ३ तर खासगी १, गुहागर सार्वजनिक २६ तर खासगी १, रत्नागिरी ग्रामीण सार्वजनिक ९० तर खासगी १२, जयगड सार्वजनिक १८ तर खासगी ४, संगमेश्वर सार्वजनिक १७ तर खासगी ६, रत्नागिरी शहर सार्वजनिक ५२, आणि पूर्णगड सार्वजनिक २० अशा एकूण सार्वजनिक ४२५ तर खासगी ६२ अशा एकूण ४८७ दुर्गामातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात ४२५ ठिकाणी सार्वजनिक तर ६२ खासगी ठिकाणी देवींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. ९० ठिकाणी देवीच्या फोटोंचे पूजन करून, दांडिया कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. अनेक ठिकाणी गरब्याचे आयोजन होणार असून ३६ हजार ६२९ ठिकाणी खासगी तर १७४ ठिकाणी सार्वजनिक घटस्थापना केली जाणार आहे. रत्नागिरी शहरातदेखील मागील काही वर्षात नवरात्रौत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याची प्रथा सुरू झाली आहे. नवरात्र उत्सव मंडळांसह अनेक ठिकाणी दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याने या उत्सवाची रंगत आणखी वाढत आहे. दांडिया स्पर्धेत विशेष करून युवा पिढीचा सहभाग अधिक असल्याने राजकीय मंडळीदेखील या उत्सवाचा राजकीय फायदा करून घेण्यास पुढे सरसावलेले दिसून येतात.

## हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठान व राजापूर आगाराच्या संयुक्त विद्यमाने राजापुरात शारदीय नवरात्रौत्सवात नवदुर्गा दर्शन यात्रेचे आयोजन

**राजापूर (वार्ताहर)**

राजापूरच्या धार्मिक पर्यटनाला चालना मिळावी या उद्देशाने येथील हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानच्यावतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ राजापूर आगाराच्या सहयोगाने शुक्रवार ४ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या शारदीय नवरात्रौत्सव काळात 'नवदुर्गा दर्शन' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या आठ दिवसांच्या कालावधीत दररोज सवलतीच्या दरात तालुक्यातील प्रमुख नवदुर्गा दर्शनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे. शुक्रवार ४ ऑक्टोबर ते शुक्रवार ११ ऑक्टोबर या दरम्यान दररोज सकाळी ७ ते सायं. ७.३० वा. अशी ही दर्शन यात्रा असणार आहे.

यामध्ये तालुक्यातील पेंडखळे येथील श्री जाकादेवी, देवीहसोळ येथील श्री आर्यादुर्गा, भालावली येथील श्री नवदुर्गा, आडिवरे येथील श्री महाकाली, धाऊलवल्ली येथील श्री नवलादेवी, होळीची ग्रामदेवता श्री भरतदुर्गा देवी, मिठगवाणेची ग्रामदेवता श्री मुहूर्तादेवी, साखर येथील श्री नवलादेवी आणि विलये येथील श्री दुर्गादेवी यांचे दर्शन घेता येणार आहे.

या दर्शनयात्रेकरिता दररोज सकाळी ७ वाजता जवाहर चौक राजापूर येथून एस.टी. बस निघेल आणि नऊ दुर्गा देवींचे दर्शन घेऊन सायंकाळी ७.३० ला जवाहर चौक राजापूर येथे परत येईल. या एका दिवसाच्या यात्रेकरिता पुरूष भाविकांना रू. ५५५, महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना रू. ४४४ आणि अमृतानुभव भक्तांना रू. ३३३ अशा सवलतीच्या दरात ही यात्रेची संधी उपलब्ध करण्यात आली आहे.

यातील सहभागी भाविकांना प्रवासादरम्यान विमा सरंक्षण, सकाळी चहा, नाश्ता, दुपारी जेवण, सायंकाळी चहाची सोय केली जाणार आहे. तर प्रत्येक धार्मिक स्थळाच्या ठिकाणी त्या त्या देवतेची महती सांगणारी गाईड सोबत असणार आहे. तर सहभागी महिला भाविकांना दरदिवशी एका भाग्यवान महिलेला मानाची साडी भेट देण्यात येणार आहे. भाग्यवान महिलेची निवड सोडत पद्धतीने केली जाणार आहे.

राजापूरचे धार्मिक पर्यटन वाढीस लागावे आणि जास्तीत जास्त भाविकांना तालुक्यातील या नऊ दुर्गांचे नवरात्रीच्या पर्वणी काळात दर्शन घेता यावे, या उद्देशाने या नवदुर्गा दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याचे हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश मयेकर यांनी सांगितले.

ज्या भाविकांना या दर्शन यात्रेत सहभागी व्हावयाचे आहे. अशांनी आपली आगावू नाव नोंदणी करणे आवश्यक असून नावनोंदणीसाठी आपले आधारकार्डसह महेश मयेकर ९४२२४२५७४०, मोहन घुमे ९४२२७ ६३०३२, मंदार बावधनकर ८९८३७ ५७२७३, विवेक गुरव, निकेश पांचाळ, अजितकुमार गोराडे, सचिन मोरे, प्रकाश झोरे यांच्याशी संपर्क साधावा. जास्तीत जास्त भाविकांनी या दर्शनयात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजापूर एस.टी. आगार आणि हिंदवी स्वराज्य प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

## डेरवणच्या प्रथमेश, संस्कार, हर्ष यांचा केरळमधील स्पर्धेत लक्ष्यवेध

### एसव्हीजेसीटीच्या शूटिंग रेंजमध्ये प्रशिक्षण

**चिपळूण (प्रतिनिधी)**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण परिषद (सीबीएससी) अंतर्गत शाळांच्या नेमबाजी (शूटिंग) स्पर्धा, साई कृष्णा पब्लिक स्कूल, केरळ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेला विक्रमी म्हणजेच ८१९ खेळाडूंचा सहभाग लाभला. डेरवण येथील विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या क्रीडा संकुलात असणाऱ्या अद्ययावत शूटिंग रेंजमध्ये सराव करणाऱ्या तीन खेळाडूंनी या स्पर्धेत उत्तुंग यश पटकावले.

रायफल शूटिंग या क्रीडा प्रकारात संस्कार शेडगे याने सातवा क्रमांक, प्रथमेश कदम याने पाचवा क्रमांक आणि हर्ष बागवे याने ब्राँझ मेडल जिंकून तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस जिंकले. हे तीनही विद्यार्थी डेरवण येथील एसव्हीजेसीटी ट्रस्टच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचे विद्यार्थी आहेत.



या तीन विद्यार्थ्यांबरोबरच डेरवण येथील शूटिंग रेंजमध्ये प्रशिक्षक सागर साळवी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहेत. प्रशिक्षणाच्या दृष्टीने खडतर आणि खर्चिक असणाऱ्या या खेळासाठी कोणतेही प्रशिक्षण शुल्क या शूटिंग रेंजवर आकारले जात नाही. शाळेकडूनही विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेतून नेमबाजीच्या प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येते. त्यामुळे तयार झालेल्या पोषक वातावरणामुळे आमच्या खेळाडूंनी हे यश मिळवले, असे त्यांच्या पालकांनी आवर्जून सांगितले.

खेळाडूंनी मिळविलेल्या यशासाठी संचालिका शरयू यशवंतराव, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, क्रीडा संयोजन समितीचे प्रशांत सावंत, अजित गालवणकर, योगेश विचारे यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## राजापूर तालुक्यात १७ ठिकाणी होणार दुर्गामाता मूर्तीची प्रतिष्ठापना

**राजापूर (वातार्हर)**

तालुक्यात गुरूवारपासून शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ होत आहे. सर्वसाधारणपणे दहा दिवस चालणाऱ्या या उत्सवात तालुक्यात १७ नवरात्रौत्सव मंडळांच्यावतीने दुर्गादेवीची मूर्ती प्रतिष्ठापित करून उत्सव साजरा केला जाणार आहे. तर २६ ठिकाणी देवीचे फोटो पूजन करून गरबा नृत्य केले जाणार आहे. तर गावोगावी ग्रामदेवतांच्या मंदिरात घटस्थापना करून पारंपरिक पध्दतीने हा उत्सव साजरा केला जाणार आहे. या नवरात्रौत्सव मंडळाकडून या उत्सवाची जय्यत तयारी हाती घेण्यात आली आहे.

सार्वजनिक पद्धतीने मूर्ती प्रतिष्ठापना करून उत्सव साजरा केल्या जाणाऱ्या मंडळामध्ये राजापूर शहरात वरचीपेठ येथील महापुरूष सेवा मंडळ, जवाहर चौक येथील चव्हाटा नवरात्रौत्सव मंडळ, आंबेवाडी येथील हनुमान मंडळ, ओगलेवाडी व एस.टी. डेपो येथे जय महाराष्ट्र मंडळातर्फे उत्सव साजरा केला जातो. तर तालुक्यात पाचल, कोतापूर, ताम्हाणे, ओझर, तर नाटे पोलीस दूरक्षेत्राच्या कक्षेत सागवे, तुळसुंदे, जैतापूर, आडिवरे आदी आठ ठिकाणी देवीची प्रतिष्ठापना करून उत्सव साजरा केला जाणार आहे.



शिवाय गावागावात २६ मंडळाकडून फोटो प्रतिमा पूजन करून गरब्यासहीत उत्सव साजरा केला जाणार आहे. तर ग्रामदेवतांच्या मंदिरात देवांना वस्त्रालंकारानी सजवून घटस्थापना केली जाणार आहे. या उत्सवात नऊ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## आडिवरेतील श्री महाकाली मंदिरात गुरूवारपासून शारदीय नवरात्रौत्सवाला प्रारंभ

**राजापूर (वार्ताहर)**

शारदीय नवत्रौत्सवात भाविकांची मोठी गर्दी होणाऱ्या तालुक्यातील आडिवरे येथील श्री महाकाली मंदिरात शारदीय नवरात्रौत्सवाला गुरूवार दि. ३ ऑक्टोबर घटस्थापनेपासून प्रारंभ होणार आहे. उत्सव काळात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवानिमित्त मंदिर परिसर सुशोभित करण्यात आला असून मंदिरावर नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

भक्तांच्या नवसाला पावणारी म्हणून आडिवरेतील श्री महाकालीची सर्वदूर ख्याती आहे. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून या ठिकाणी नवरात्रौत्सवाला प्रारंभ होत आहे. या उत्सव काळात देवीच्या दर्शनासाठी रत्नागिरी जिल्ह्यासह लगतच्या सिंधुदुर्ग, कोल्हापूर येथूनही भाविकांची मोठी गर्दी होत असते. कोल्हापूरच्या अंबाबाई स्थानाइतकेच महत्त्व या स्थानाला आहे. ३ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर या कालावधीत विविध कार्यक्रमांनी मंदिरात नवरात्र उत्सव साजरा होणार आहे.

उत्सव काळात येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी म्हणून मंदिर व्यवस्थापनाकडून योग्य ती खबरदारी घेण्यात आली आहे. उत्सव काळात दररोज सकाळी ७ ते ११ या वेळात पूजापाठ, अभिषेक व महानैवेद्य, दुपारी ३ वाजता घटाची आरती, सायं. ४ ते ५ वाजेपर्यंत राजापूर येथील ह.भ.प. विद्याधर करंबेळकर यांचे कीर्तन, सायंकाळी ६.३० वाजता धूपारती, त्यांनतर रात्रौ ७ ते ८ या वेळात रत्नागिरी येथील वेदशास्त्र संपन्न ओंकार मुळ्ये यांचे प्रवचन, रात्रौ ८ ते ९ या वेळेत सांगली येथील अभिषेक काळे यांचा गायन कार्यक्रम होणार आहे. रात्रौ ९ ते १०.३० या वेळेत पालखी प्रदक्षिणा होईल.



तर दररोजच्या मनोरंजनात्मक कार्यक्रमांमध्ये रात्रौ ११ वाजता गुरूवार ३ रोजी पहिल्या माळेला महिला मंडळ रत्नागिरी यांचे नमन, दुसऱ्या माळेला शुक्रवार ४ रोजी कोंभे येथील कलाकारांचे अधांतर हे नाटक सादर होणार आहे. तिसऱ्या माळेला शनिवार ५ रोजी श्री रवळनाथ रिमिक्स मंडळ यांचे बहुरंगी नमन, चौथ्या माळेला रविवार ६ रोजी संजय खापरे मुंबई यांचे सैरभर नाटक सादर होणार आहे. सोमवार ७ रोजी पाचव्या माळेला श्रीरंग रत्नागिरी निर्मित 'लव लग्न लोचा' हे नाटक तर मंगळवार ८ रोजी सहाव्या माळेला श्री रासाई देवी नाट्य मंडळ नवेदर यांचे 'माझ्या मना' हे नाटक सादर होणार आहे. बुधवार ९ रोजी सातव्या माळेला रत्नागिरी येथील कलाकारांचा रेकॉर्ड डान्स तर गुरूवार दि. १० रोजी आठव्या माळेला संस्कृती फाऊंडेशन लांजा यांचा 'रंग भरू दे आमुच्या गणा' हे नाटक सादर केले जाणार आहे. शुक्रवार ११ रोजी नवव्या माळेला राजेश निकम खेड विरूद्ध देवेंद्र झिमण लांजा यांचा शक्ती-तुरा डबलबारीचा कार्यक्रम होणार आहे.

असे नऊ दिवस मनोरंजनासाठी विविध कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान या कालावधीत दररोज सायं. ६.३० ते ९.३० वाजेपर्यंत विविध पारंपरिक कार्यक्रमांमुळे देवीचे दर्शन बंद राहणार असल्याचे सूचित करण्यात आले आहे. यंदाचा उत्सव आणि कार्यक्रमांचा मोठ्या संख्येने भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महाकाली देवस्थान ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## जल्लोष लोककलेचा महोत्सवाचे चिपळुणात आयोजन

### दिंडीने होणार महोत्सवाचा शुभारंभ

**चिपळूण (वार्ताहर)**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था असणाऱ्या बालरंगभूमी परिषद, मुंबई आयोजित आणि बालरंगभूमी परिषद शाखा, रत्नागिरी संयोजित चिपळूण शहरातील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रात ४ व ५ ऑक्टोबर २०२४ असे दोन दिवस 'जल्लोष लोककलेचा' या महाराष्ट्रातील लोककलांवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

रत्नागिरी शाखा संयोजक असलेल्या या कार्यक्रमात नृत्य, वादन व गायन अशा प्रकारात रत्नागिरी जिल्ह्यातील विविध शाळांच्या बालकलाकारांची स्पर्धा होणार असून विजेत्यांना रोख रक्कम व अन्य पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा शाखेचे अध्यक्ष नंदकिशोर जुवेकर यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.




यावेळी कार्याध्यक्ष ओंकार रेडिज, खजिनदार शौकतअली गोलंदाज, सीमा कदम, नाट्य परिषदेचे दिलीप आंब्रे, मंगेश बापट आदी उपस्थित होते. ४ व ५ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजल्यापासून इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रात लोककलेचा जल्लोष सुरू होईल. तत्पूर्वी सकाळी शालेय विद्यार्थ्यांची चिपळूण नगर परिषद ते इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्र अशी भव्य दिंडी काढण्यात येईल. या लोककला महोत्सवात समूह नृत्य, समूह गायन, एकल गीत, एकल नृत्य, एकल वाद्य वादन अशा स्पर्धांचा महोत्सव रंगणार आहे. रत्नागिरी जिल्हा शाखेचे अध्यक्ष नंदू जुवेकर, कार्याध्यक्ष ओंकार रेडीज यांच्यासह जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी, सदस्य आणि सभासद या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा चिपळूणचेही महत्त्वाचे सहकार्य या महोत्सवाच्या आयोजनात असून स्थानिक शिक्षण विभागासह चिपळूण नगर परिषदेचेही सहकार्य लाभत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## निवाचा तळ येथे नाला दुरुस्ती कामाचे भूमिपूजन

**खेड (प्रतिनिधी)**

शहरातील निवाचा तळ खतीब यांच्या घराजवळ नाला दुरुस्ती करण्याच्या कामाचे भूमिपूजन आ. योगेश कदम यांच्या हस्ते नुकतेच झाले. या कामासाठी ३९ लाख ६३ हजार ५७३ रुपये मंजूर झाले आहेत. यावेळी आ. कदम म्हणाले, अशी अनेक विकासकामे मार्गी लावण्यासाठी मी सदैव कटिबद्ध राहीन. यावेळी कुंदन सातपुते, सरफराज पांगारकर, जावेद कौचली, मजीद खान, शामशुद्दीन जुईकर, फारुक मणियार, अफजल पांगारकर, वासिम रायणे, युसूफ गझली, माधवी बुटाला, सिद्धेश खेडेकर, रसिका खेडेकर, संजना कुडाळकर शिवसैनिक आणि नागरिक उपस्थित होते.

## दुर्गादेवी नवरात्रौत्सव मंडळातर्फे साळवी नगर गोळप सडा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**गावखडी (वार्ताहर)**

गुरूवार ३ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या नवरात्रौत्सवानिमित्त रत्नागिरीत तालुक्यातील दुर्गादेवी नवरात्रौत्सव मंडळ, साळवी नगर, गोळप सडा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये ३ ऑक्टोबर २०२४ रोजी स. ८ वा.देवीचे आगमन, स. १० वा. ढोलताशांच्या गजरात देवीची सभामंडपापर्यंत मिरवणूक स. ११.३० वा. दुर्गादेवी नवरात्रौत्सव मंडळ अध्यक्षा निहा साळवी यांच्या हस्ते देवीची प्रतिष्ठापना, पूजा, आरती व कार्यक्रम कालावधीत दररोज रात्री ९.३० वा. दांडिया रास, ५ ऑक्टोबर रोजी रात्री १०.३० वा. भजनांचा जंगी सामना, बुवा श्रीकांत शिरसाट, मुंबई × बुवा अभिषेक शिरसाट ६ रोजी सायं. ४ वा. हळदीकुंकू समारंभ, सायं. ६ वा. होम मिनिस्टर स्पर्धा, ७ रोजी रात्री ९.३० वा.डान्स स्पर्धा (वयोगट ५ ते १८ ) संपर्क ९४२१७०७५८९, ८ रोजी सायं. ४.३० वा.गोंधळ जोगवा मागण्याचा कार्यक्रम, सायं. ७.३०वा. दिवटी नाचवण्याचा कार्यक्रम, रात्री १० वा. गोंधळाची कथा, ९ रोजी सायं. ४.३० वा. पाककला स्पर्धा (पदार्थ मूग) व रांगोळी स्पर्धा (विषय - संस्कार भारती ), १० रोजी स. १० वा. होमहवन, कुमारी पूजन, ११ रोजी दु. १ वा. महाप्रसाद, रात्री १० वा.बक्षीस वितरण समारंभ, रात्री ११ वा. शक्ती-तुऱ्याचा जंगी सामना बुवा जगन्नाथ खारगांवकर, तुरेवाले रायगड × तेजल पवार शक्तीवाले, खालगाव रत्नागिरी, १२ रोजी सायं. ५.३० वा. मंदिरामध्ये सोने वाटपाचा कार्यक्रम, सायं. ७ वा.आरती, १३ रोजी दु. ३.३० वा. आरती- गाऱ्हाणे, ४ वाजता देवीची विसर्जन मिरवणूक, रात्री ७.३० वा.आरती होणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावे, असे आवाहन दुर्गादेवी नवरात्रौत्सव मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## सूरवर्धन आयोजित लतादीदी २०२४ सुगम संगीत स्पर्धेत गायत्री जोशी यशस्वी

**संगमेश्वर (प्रतिनिधी)**

कसबा, संगमेश्वर येथील गायत्री कौस्तुभ जोशी यांनी सूरवर्धन आयोजित लतादीदी २०२४ सुगम संगीत गायन स्पर्धेत तृतीय क्रमांकाचा सन्मान प्राप्त केला आहे. गायत्री जोशी म्हणजे पूर्वाश्रमीच्या आश्विनी सुनील आपटे यांनी या स्पर्धेत ग्रुप-१ मधील (५० वर्षांपर्यंतच्या) गटात खेळ मांडियेला वाळवंटी ठायी... हा भूप, नट रागातील संत तुकाराम महाराजांचा अभंग सादर करून, हे यश प्राप्त केले.



गायत्री जोशी सध्या शास्त्रीय संगीताचे धडे संगीत अलंकार निहाली गद्रे यांच्याकडे घेत आहेत. गायत्री यांची सध्या संगीत विशारद प्रथमची तयारी सुरू असून, सध्या त्या एस.एन.डी.टी. विद्यापीठ, पुणे येथे सुगम संगीत डिप्लोमाचे शिक्षण घेत आहेत. यापूर्वी त्यांनी शास्त्रीय संगीत मध्यमा पूर्ण केले आहे. गायत्री जोशी सध्या देवरुख येथे नवोदित गायकांसाठी गायनाचे वर्ग घेत आहेत. त्यांनी मिळवलेल्या यशाचे त्यांच्या गुरु निहाली गद्रे आणि अभिनेत्री गात यांनी अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## वयाच्या साठीतही 'ते' जपताहेत कोकणची पारंपरिक लोककला

### निवेखुर्द येथील सुभाष परब यांचे लोककलेतून प्रबोधन व परंपरेचे जतन

**देवरूख (प्रतिनिधी)**

कोकणातील सण-उत्सवाला सध्या आधुनिकतेचे स्वरूप दिसून येत आहे. त्याप्रमाणे कोकणातील लोककलेत देखील ते पहायला मिळते. मात्र ग्रामीण भागातील लोक कलावंत आपली परंपरिकता आजदेखील जपत आहेत. संगमेश्वर तालुक्यातील निवेखुर्द परबवाडी



येथील सुभाष उर्फ नाना परब हे सण-उत्सवाच्या काळात अनेक पारंपरिक लोककला जोपासत आहेत.

डफावरील गीतांची शाहिरी, जाखडी, नमन, भजन, कीर्तन, भल्लोरी, बासरी वादन अशा अनेक कला सुभाष उर्फ नाना परब हे वयाच्या साठीतही जपत आहेत. भजन व कीर्तनातून प्रबोधन, तर जाखडीतून स्वरचित गीते त्यांनी गायली आहेत आणि रसिकांनीही त्याला उत्तम प्रतिसाद दिला आहे. तर नमन या लोककलेत त्यांनी अनेक पात्रांची वेशभूषा करत उत्तम अभिनयही केला आहे. त्यांची पत्नी देखील त्यांच्या प्रमाणे महिलांचे टिपरी नृत्य असो वा अन्य संस्कृतिक कार्यक्रम असो त्यामध्ये सहभागी होत आपली कला सादर करत असतात.

सण-उत्सवात हे दोघेही आपली कला जोपसत आहेत. विशेष म्हणजे कोणतीही वही हातात न घेता पारंपरिक गीते आणि त्यांचा वारसा टिकवण्याचे काम या परब परिवाराकडून होत आहे. आजच्या आधुनिक युगात



पारंपरिक लोककलेला नवा साज चढलेला दिसतो. पारंपरिक गीतांना चित्रपटाच्या चाली आल्याने जुनी गीते आता ऐकायला येत नाहीत. संत मंडळींनी पोवाडा असो, भजन, कीर्तन असो, यातून जुना इतिहास गीताच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. त्याच पद्धतीने आपली संस्कृती व पारंपरिकता पुढे सुरु ठेवण्यासाठी लोक कलाकारांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे मत सुभाष उर्फ नाना परब यांनी व्यक्त केले आहे.

# शासनाकडून राज्यातील गोशाळांना प्रति गाय, प्रति दिन ५० रुपयांचे अनुदान : ना. विखे यांची माहिती

◆ शिर्डी (प्रतिनिधी):

सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील गोशाळांना देशी वंशाच्या गायीसाठी परिपोषण योजनेमार्फत 'प्रति गाय- प्रति दिन ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती राज्याचे पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. सदर योजना कायमस्वरूपी असून योजनेमुळे देशी गायींचे संगोपन व संवर्धन होऊन गोशाळांवरील आर्थिकभार कमी होईल, असा विश्वास मा. मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला. सदरची योजना शासनातर्फे गोसेवा



आयोगाच्या मार्फत राबवली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान राज्यातील गोवंश हत्येला बंदी असल्याने अनुउत्पादक, भाकड झालेल्या पशुंचा सांभाळ करणे शेतकऱ्यांना व पशुपालकांना कठीण होत आहे. अशी अनुउत्पादक, भाकड झालेली जनावरे मोकाट सोडली जातात अथवा गोशाळेत पाठवली जातात. परिणामी गोशाळा, गोसदन, पांजरपोळ, गोक्षण संस्थांमध्ये अशा जनावरांची संख्या वाढत आहे. या जनावरांपासून मिळणारे उत्पन्न अत्यल्प असल्याने गोशाळांना त्यांचे संगोपन करणे आर्थिकदृष्या परवडत नाही. ह्या संस्था बळकट करण्याच्या अनुषंगाने शासनाने या संस्थाना आर्थिक सहाय्य करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी सदरची योजना कायमस्वरूपी राबविली जाणार आहे.सन २०१९ मध्ये करण्यात आलेल्या २० व्या पशुगणनेनुसार राज्यात ९३,८५,५७४ देशी गोवंशीय पशुधन आहे.एकात्मिक पाहणी योजनेच्या सन २०१८-१९ च्या अहवालानुसार देशी गायींचे प्रतिदिन प्रतिगाय दुध उत्पादन ३.४८१ लिटर आहे. देशी गायीचे दुध उत्पादन तुलनात्मकदृष्टया कमी असल्याने, देशी गोवंशीय पशुधनाची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. १९ व्या पशुगणनेची तुलना करता,२० व्या पशुगणनेमध्ये देशी गोवंशीय पशुधनाची संख्या २०.६९ टक्क्यांनी कमी झाली आहे.सध्या राज्यात ८२८ नोंदणीकृत गोशाळा असून त्यात अंदाजे दीड लाखाच्यावर पशुधन आहे. गोशाळांनी देशी गाईचे जतन व संवर्धन करण्यासाठी परिपोषण आवश्यक असल्याने मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने या गोष्टीचा विचार करुन मा.मंत्री राधाकृष्ण विखेपाटील, मंत्री पशुसंवर्धन, व दुग्धव्यवसाय यांनी याबाबतचा प्रस्ताव मत्रिमंडळाला सादर करुन मंत्री मंडळाने सोमवारी संमत केला आहे.सदर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे संस्थेची नोंदणी असणे आवश्यक आहे. सर्व जनावरांचे भारत पशुधन प्रणालीवर इयर टॅगींग करणे अनिवार्य आहे. योजनेसाठी गोसेवा आयोगाकडून ऑनलाइन अर्ज मागविले जाणार आहेत. गोसेवा आयोगाकडील अर्जाची पडताळणी ही जिल्हा गोशाळा पडताळणी समितीच्या वतीने केली जाणार आहे. त्यानंतर पात्र संस्थेला त्यांच्याकडे असेलेल्या पशुधनानुसार सरळ खात्यावर पैसे जमा केले जाणार आहेत.या अगोदरही मंत्री विखे पाटील यांनी सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना आणून गोशांळाना बळकटी देण्याचे काम केले आहे आणि आता प्रति गाय-प्रति दिन ५० रुपये अनुदान योजना आणून गोशाळांना आर्थिकदृष्या सक्षम केले आहे.सदर योजना लागू केल्यामुळे महाराष्ट्र राज्यातील देश वंशावळीचे बहुमोल पशुधन जतन व संवर्धन करण्यास मदत होणार असल्याने शेतकरी व गोशाळा चालक यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण आहे.



## श्री कपिलेश्वर संस्थानतर्फे स्वयंसेवकांसह गरुड झेपच्या विद्यार्थ्यांचा सन्मान

**नाशिक :** श्रावण मासानिमित्त कपालेश्वर येथे भाविकांची मोठी गर्दी असून या गर्दीत भाविकांचे शांतते दर्शन व्हावे, कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी गरुड झेप अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून प्रत्येक श्रावण सोमवारी उत्कृष्टपणे स्वयंसेवक म्हणून कार्य केले. या विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल श्री कपालेश्वर संस्थांच्या वतीने सन्मान सोहळा दि २९ रविवार रोजी आठवण लॉन्स पंचवटी येथे आयोजन करण्यात आला होता यावेळी सह धर्मदाय आयुक्त टी एस अकाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पोलीस भरती होऊन प्रशासनात काम करण्यासाठी तयार असलेल्या या विद्यार्थ्यांना हा आगळावेगळा अनुभव यावेळी आला असून याबाबत विद्यार्थिनी समाधान व्यक्त केले आहे याप्रसंगी संस्थांनचे अध्यक्ष अक्षय कलंत्री,सचिव प्रशांत जाधव, सुनील पाटील, श्रीकांत राठी, मंडलेश्वर काळे, श्रद्धा दुसाने, रावसाहेब कोशिरे, सुनील शिनगाण सुनीता मोडक,शीतल सोनवणे आदी उपस्थित होते या सन्मानाबाबत गरुड झेप ॲकॅडमीचे संचालक एस एस सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## वेचक

### अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी शुल्क योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत

**नाशिक :** भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजनेचे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या सत्राचे अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन प्रणाली ही २५ सप्टेंबर २०२४ पासून कार्यान्वित झाली आहे. आदिवासी प्रकल्पांर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील नाशिक, त्र्यंबकेश्वर, सिन्नर, निफाड, येवला, दिंडोरी, इगतपुरी व पेठ तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी https://mahadbt.maharashtra.gov.in ही प्रणालीवर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे अर्ज भरावेत, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पित चौहान यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवीन व नुतनीकरण अर्ज महाविद्यालयीनस्तरावर सादर करावेत. महाविद्यालयांनी याबाबत वर्गात व सूचना फलकावर याबाबत विद्यार्थ्यांना अवगत करावे. अनुसूचित जातीचे विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजनेपासून वंचित राहिल्यास याची संपूर्ण जबाबदारी महविद्यालयाची राहील, असेही प्रकल्प अधिकारी चौहान यांनी कळविले आहे.

### भ्रष्टाचार निर्मूलन समितीतर्फे दिनकर चव्हाण पुरस्काराने सन्मानित



**चांदवड :** अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती व मानव अधिकार ब्रिक्स ह्युमन रा ईट यांच्या १४ वे अधिवेशन लातुर येथे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेच संपन्न या अधिवेशनात चांदवड तालुका अध्यक्ष दिनकर विठ्ठलराव चव्हाण यांना समितीतर्फे शहिद चंद्रशेखर आझाद राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीतर्फे चांदवड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्ना वर तसेच पुणेगाव दरसवाडी डोंगरगाव कालव्याच्या मांजरपाडा प्रकल्प विषयी चांदवड तहसील कार्यालयावर यशस्वी आंदोलने करून शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा दिल्याने समितीने याच कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापुरकर यांचे हस्ते राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी या कार्यक्रमासाठी देशातील सर्व प्रांताध्यक्ष महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष उपस्थित होते डॉ. कविता रायजादा, राणी स्वामी ,सफलता सिंग, हितेश दाभाडे, पंडितराव तिडके, अतुल देसले, सारिका नागरे आदी उपस्थित होते.

## लोकअदालतमध्ये महावितरणच्या ग्राहकांचा सहभाग

# नाशिक परिमंडलात ४६५ ग्राहकांनी केला ३६ लाख रुपयांचा भरणा

◆ नाशिक (प्रतिनिधी):

कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेले व वीज चोरी संबंधित न्यायालयात प्रलंबित असलेली अशा महावितरणशी संबधित नाशिक, मालेगाव आणि अहमदनगर मंडळातील एकूण ३६९ ग्राहकांनी प्रतिसाद देऊन तडजोडीच्या माध्यमातून शनिवारी २८ सप्टेंबर रोजी नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील न्यायालयांमध्ये घेण्यात आलेल्या लोकअदालतमध्ये २३ लाख ३६ हजार रुपयांचा भरणा करून सदर प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे.

शनिवारी २८ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या लोकअदालतमध्ये महावितरणकडून कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेले व वीजचोरी संबंधित दाखलपूर्व प्रकरणे आणि न्यायालयात प्रलंबित असलेली हजारो प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती, त्यात कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित असलेले ग्राहक यामध्ये नाशिक मंडळात १०९ ग्राहकांनी ३ लाख ८३ हजार, मालेगाव मंडळातील १४ ग्राहकांनी १ लाख ५० हजार तसेच अहमदनगर मंडळातील २४६ ग्राहकांनी १८ लाख २ हजार



असे नाशिक परिमंडलात एकूण ३६९ दाव्यामध्ये ग्राहकांनी तडजोड करीत २३ लाख ३६ हजार रुपयांचा भरणा केला तसेच वीजचोरी संबंधित एकूण १६ दाव्यामध्ये तडजोड करीत ग्राहकांनी १ लाख ६१ हजार रुपयांचा भरणा केला आहे. अशी एकूण नाशिक परिमंडलामध्ये एकूण ४६५ प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यात आली यामध्ये ३५ लाख ७८ हजार रुपयांचा भरणा केला आहे. यासाठी विधी सेवा प्राधिकरण अधिनियम प्रमाणे संबधीताना नोटीस पाठविण्यात आल्या होत्या, संबधीतानी नाशिक व अहमदनगर मधील जिल्हा व तालुका न्यायालयात उपस्थित राहून त्यांनी या संधीचा लाभ घेतला. या लोकअदालतमध्ये विनाविलंब न्याय मिळवण्याच्या दृष्टीकोनातून तसेच परस्पर समन्वयासाठी सदर लोकअदालतचे आयोजन करण्यात आले होते. भविष्यातील आर्थिक व मानसिक कटकटींपासून सुटका होत असल्याने ग्राहकांनी या लोकअदालतीचा लाभ घेतला. महावितरणच्या नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता दिपक कुमठेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक्षक अभियंते ज्ञानदेव पडळकर, जगदीश इंगळे आणि रमेश पवार , वित्त व लेखा विभागाचे सहायक महाव्यवस्थापक हेमंत भामरे, वरिष्ठ व्यवस्थापक सचिन भडके, सहाय्यक विधी अधिकारी रणजीत बोम्मी, कनिष्ठ विधी अधिकारी नंदा महाले यांचेसह अभियंते, वित्त व लेखा विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# इनो स्पेअरतर्फे करिअर मार्गदर्शन कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

◆ नाशिक ( प्रतिनिधी ) :

सीएमसी कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये इनो स्पेअरतर्फे आयोजित करियर मार्गदर्शन कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रमुख पाहूणे म्हणून मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस नितीन ठाकरे, शिवसेनेचे ऊर्जा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय बोरस्ते, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे ,संदीप फाऊंडेशनचे प्राचार्य दीपक पाटील, ईआरपीचे अभिजीत काटकर, इनो स्पेअर कन्सल्टिंगचे संचालक अमोल पितळे आणि तृप्तीदा काटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

शाम कसबे , नाशिक सायकलिस्टचे अध्यक्ष किशोर माने यांनी मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी नितीन ठाकरे यांनी सांगितले की, मुलांनी वृत्तपत्रांचे वाचन दररोज करणे आवश्यक आहे .चांगले पुस्तक चांगले विचार आयुष्यात पुढे जाण्यासाठी मदत करतात. काळानुसार वेगवेगळ्या गोष्टी तुम्ही सतत शिकत असले पाहिजे. तर अजय दादा बोरस्ते यांनी सांगितले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्दीने अभ्यास करा, तरुणाईने आपली ऊर्जा जर व्यवस्थित दिशेने लावली तर आपण जगात एक नंबरचा राष्ट्र होऊ शकतो, असे सांगितले. डी.एम. बोरसे यांनी आयटी म्हणजे काय ? हे अतिशय सोप्या आणि सरळ भाषेत सगळ्यांना समजून सांगितले

काटकर यांनी ब्लॉक चेन, आर्टिफिशियल इंटेलिजन्स,



सायबर सिक्युरिटी, ईआरपी याविषयी विस्तृत माहिती दिली. स्कीलपर्सनची गरज आता मार्केटमध्ये खूप आहे. जर आयुष्यात पुढे जायचं असेल तर सतत तुम्ही शिकत राहिला हवे, संदीप फाऊंडेशनचे प्राचार्य दीपक पाटील यांनी मुलांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सतत नाविन्यपूर्ण शिकणे एका जागी बसून एकाग्रतेने अभ्यास करणे सगळ्यात महत्त्वाचे तुम्ही चांगल्या लोकांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे व सकारात्मक विचारसरणी असली तर तुम्ही कुठलेही ध्येय साध्य करू शकता.

यावेळी धनंजय बेळे यांनी आयटीसाठी नाशिकमध्ये अतिशय उत्कृष्ट नोकरीच्या संधी आहे, असे सांगितले. डी. एम. बोरसे यांनी आभार मानले. चौधरी प्रतिष्ठानच्या उपाध्यक्ष पद्मिनी काळे , योगेश कासार, प्रशांत अलई उपस्थित होते. तसेच यावेळी मुलांबरोबर त्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# येवलातील शिवसृष्टी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे २ ऑक्टोबर रोजी दिमाखदार सोहळ्यात होणार लोकार्पण

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते, छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली, तर पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार शिवसृष्टी लोकार्पण सोहळा

◆ नाशिक (प्रतिनिधी):

येवला शिवसृष्टी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते व अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली आणि ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.२ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता करण्यात येणार आहे. शिवसृष्टीचे लोकार्पण करण्यात आल्यानंतर जनता विद्यालयांच्या प्रांगणात भव्य दिव्य सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यास मतदारसंघातील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे विधानसभा अध्यक्ष वसंत पवार यांनी केले आहे.

राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या संकल्पनेतून येवला शहरात



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराजाच्या संकल्पनेवर आधारित सुमारे चार एकर जागेत भव्य शिवसृष्टी प्रकल्प साकारण्यात आला आहे. या प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील विविध विकास कामांचे लोकार्पण दि.२ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता करण्यात येणार आहे.

मंत्री छगन भुजबळ यांच्या संकल्पनेतून या शिवसृष्टी प्रकल्पात श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा १२ फुट उंचीचा ब्राँझ धातूचा पूर्णाकृती सिंहासनाधिष्टीत पुतळा बसविण्यात आला आहे. या प्रकल्पाची संपूर्ण रचना ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राजदरबारा प्रमाणे असणार आहे. शिवसृष्टीचे भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आले आहे.या प्रवेशद्वाराला असलेले तीनही दरवाजे सागवानी लाकडाचे असुन एक एका दरवाजाचे वजन दोन टन इतके आहे. शिवसृष्टीत महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या ऐतिहासिक घटना आणि महाराजांचे सेनापती यांचे भित्तीचित्रे व शिल्प, शिवकालीन शस्त्रास्त्रांचे आणि पुस्तकांचे प्रदर्शन, शिवकालीन इतिहासाची माहिती देण्यासाठी ऑडीओ व्हिज्युअल हॉल,सुरेख गार्डन, बुरुजांचा समावेश असलेली संरक्षण भिंत आणि नयनरम्य कारंजे यासह विविध कामांचा समावेश असणार आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण प्रकल्प राजस्थान येथून घडवून आणलेल्या दगडात तेथील कारागिरांच्या माध्यमातून साकारण्यात येत आहे.

असा आहे छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्टीत पुतळा शिवसृष्टीत बसविण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा १२ फूटी सिंहासनाधिष्टीत ब्राँझ धातूचा आहे.रायगडावरील तसेच विधानभवनात बसविण्यात आलेल्या पुतळ्यासारखाच हा पुतळा आहे.या पुतळ्याची रुंदी ८ फुट असून पुतळ्याची उंची १२ फुट असणार आहे. पुतळ्याचे एकूण वजन ५ टन इतके आहे. या पुतळयासाठी १५ फुट खोलवरुन कॉक्रीट चौथरा उभारण्यात आला आहे.

यावर राजस्थान येथून घडवलेले नॅचरल स्टोन व मार्बलचा वापर करण्यात आला आहे.हा पुतळा कुडाळ येथील सुप्रसिद्ध मूर्तिकार बाळकृष्ण (दाजी) पांचाळ आणि नंदु पांचाळ यांच्या हस्ते साकारण्यात आले आहे.

### सोहळ्याचे हे असणार मुख्य आकर्षण

येवला शिवसृष्टी लोकार्पण सोहळ्याच्या निमित्ताने छत्रपती शिवरायांचे धगधगते चरित्र दाखविणाऱ्या विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात सुप्रसिद्ध अभिनेते भूषण प्रधान, अविनाश नारकर, सुप्रसिद्ध अभिनेत्री ऐश्वर्या नारकर, सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे, सुप्रसिद्ध शाहीर प्रा.डॉ.गणेश चंदनशीवे यांचे सादरीकरण असणार आहे.

# शासनाच्या दर्जेदार शैक्षणिक व्हीडिओ निर्मिती स्पर्धेत मनपा शिक्षिका कुंदा बच्छाव राज्यात द्वितीय

◆ नाशिक (प्रतिनिधी):

शिक्षकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण होऊन ई-साहित्य निर्मितीची चळवळ उभी रहावी यासाठी राज्यातील सर्व माध्यमांच्या, सर्व व्यवस्थापनाच्या सर्व स्तरावरील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्यासाठी 'राज्यस्तर दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती' या खुल्या व अभिनव स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अध्यापक विद्यालयासह इ १ ली ते १२ वी पर्यंत शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांना सहभाग घेण्यास आवाहन करण्यात आले होते. इयत्ता व विषयनिहाय विशेष गट करुन यामध्ये तालुकास्तरापासून ते राज्यस्तरापर्यंत भरघोस बक्षीसे सुद्धा ठेवण्यात आली होती. या बहुचर्चित व बहुप्रतिक्षित स्पर्धेची कार्यवाही राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडून नुकतीच पूर्ण झाली असून राज्यस्तर विजेत्या ठरलेल्या



स्पर्धकांची यादी घोषित करण्यात आली आहे. यामध्ये नाशिक मनपा शाळा क्र. १८, आनंदवली येथे कार्यरत असणाऱ्या उपक्रमशील शिक्षिका श्रीमती कुंदा जयवंत बच्छाव यांनी इयत्ता ११ वी ते १२ वी इंग्रजी विषय गटातून राज्यात द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या पुरस्काराचे वितरण रविवारी २९ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते व श्रीमती.आय. ए.कुंदन (प्रधान सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई) , सूरज मांढरे, (शिक्षण आयुक्त,महाराष्ट्र, पुणे), राहुल रेखावर (संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे) यांसह सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथे झाला असून रोख रक्कम रुपये ४० हजार , रजत पदक, मोमेंटो व प्रमाणपत्र असे बक्षीसाचे स्वरुप होते. या स्पर्धेत केवळ शैक्षणिक अभ्यासक्रमावर आधारितच व्हिडिओ बनवणे बंधनकारक होते. अध्यापनात रंजकता, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर,कॉपीराईट कायद्याचे पालन, शासनाच्या ध्येय धोरणाशी सुसंगता, विषयाची मांडणी,सादरीकरण व कल्पकता या निकषांच्या आधारे दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओचे परीक्षण करण्यात आले. यासाठी तीन स्तरावर गठन करण्यात आलेल्या विविध समित्यामार्फत वस्तुनिष्ठ व पारदर्शक मूल्यमापनद्वारे ही प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली असून राज्यस्तरावर यश संपादन करणाऱ्या ८४ शिक्षकांचा गौरव SCERT, पुणे येथे केला गेला. या स्पर्धेत राज्यातील हजारो शिक्षकांनी सहभाग नोंदवला होता. यातील उत्कृष्ट ठरलेले सर्व ई-साहित्य शासनाच्या वेबसाइटवर उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

पुरस्कार विजेत्या शिक्षिका कुंदा बच्छाव यांचे दीक्षा साहित्य, पी.एम. ई. विद्या साहित्य निर्मितीतही महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. या यशाबद्दल त्यांचे मनपा शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील, डायट प्राचार्य अनिल गौतम , केंद्रप्रमुख सुनील खेलुकर, मुख्याध्यापिका अनिता जाधव, नाशिक मनपातील सर्व शिक्षक-शिक्षिका, आनंदवली गावातील ग्रामस्थ यांच्यासह सर्व स्तरातील शिक्षणप्रेमीकडून अभिनंदन करण्यात आले.

# पी. एम. विश्वकर्मा अंतर्गत प्रशिक्षण घेऊन उद्योग उभारावेत : बाळासाहेब क्षीरसागर

◆ नाशिक (प्रतिनिधी):

## जनशिक्षण संस्थानच्या 'ट्रॅडिशनल मालाकार' प्रशिक्षणाचा समारोप

शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या पी.एम. विश्वकर्मा या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील कारागिरांनी प्रशिक्षण घेऊन स्वतःचे उद्योग व्यवसाय उभारावे, असे प्रतिपादन जनशिक्षण संस्थानचे अध्यक्ष तथा मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले.

जनशिक्षण संस्थानच्या वतीने पी.एम.विश्वकर्मा अंतर्गत सुरु असलेल्या ट्रॅडिशनल मालाकार या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. संस्थेमार्फत कुशल प्रशिक्षण देऊन दर्जेदार कारागीर घडविण्याचे कार्य आमचे प्रशिक्षक करत असून, फुलांपासून विविध प्रकारचे हार, बुके, फ्लॉवरपॉट डेकोरेशन करत आहेत. हळद व लग्न समारंभासाठी वापरण्यात येणारे सजावटीचे साहित्य बनवून डोहाळे जेवणापासून ते लग्न समारंभापर्यंतच्या ऑर्डर घेऊन व्यवसायात परिपूर्णता आणावी आणि कुटुंबास आर्थिक हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या सहआयुक्त अनिसा तडवी यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनांची माहिती दिली. संचालिका ज्योती लांडगे यांनी मालाकार कोर्स मध्ये सहा दिवस घेतलेल्या विविध उपक्रम व प्रशिक्षण तसेच उद्योग व्यवसायाची माहिती दिली. कोर्सच्या मार्गदर्शक शिक्षिका हर्षदा शेळके यांनी प्रशिक्षणार्थीना उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणास खादी ग्रामोद्योग विभागाचे सुधीर केंजळे ,पी एम विश्वकर्माच्या मयुरी मुर्तडक यांनी भेट देऊन शासकीय योजनांची माहिती दिली. कार्यक्रमात यशस्वी प्रशिक्षणार्थीना उद्यमी लायसनचे वितरण करण्यात आले. प्रताप देशमुख यांनी सूत्रसंचलन केले. तर कार्यक्रम यशस्वीतेसाठी संदीप शिंदे, संगीत देठे, दत्तात्रय भोकनळ, मनोज खांदवे, स्मिता उपाध्ये, पल्लवी मोरे, सविता पवार, अंजली धुमाळे आदींनी परिश्रम घेतले.



नाशिक : जनशिक्षण संस्थानच्या वतीने पी. एम. विश्वकर्मा योजनेअंतर्गत सुरु असलेल्या ट्रॅडिशनल मालाकार या कोर्सचे प्रशिक्षणार्थीना प्रमाणपत्र प्रदान करतांना जनशिक्षण संस्थानचे अध्यक्ष तथा मविप्रचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर.

# ‘मुंदडा’तुमचे कार्यकर्ते पत्रकारांना जीवे मारण्याच्या धमक्या देताहेत!

**पत्रकार रोहन गलांडे यांना बातम्या का करतो म्हणून धमकी** • **पत्रकारांचे शिष्टमंडळ घेणार पोलीस अधीक्षक यांची भेट** • **भुरट्या कार्यकर्त्यांनो नेत्यांची एवढी हुजरेगिरी करायची नसते**

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज मतदार संघाच्या विद्यमान आमदार, त्यांचे सासरे आणि पती यांच्या कार्यकर्त्याकडून दैनिक पुण्यभूमीचे तालुका प्रतिनिधी रोहन गलांडे यांना बातम्या का करतोस असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे माझ्या जीविका काही बरे वाईट झाले तर आ.नमिता, त्यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा, पती अक्षय मुंदडा आणि धमकी देणारा कार्यकर्ता जबाबदार राहील.अशी तक्रार दैनिक पुण्यभूमीचे तालुका प्रतिनिधी रोहन गलांडे यांनी जिल्हा प्रशासनास दिली आहे.

केज मतदार संघाच्या विद्यमान आ.नमिता यांचा कार्यकाल सुरुवातीपासूनच वादग्रस्त राहिलेला आहे. मागासवर्गीय प्रवर्गातून निवडून आलेल्या नमिता आजपर्यंत मागासवर्गीयांचे




प्रश्न सोडविण्यास असफल ठरलेल्या आहेत.

गेल्या पाच वर्षात मागासवर्गीयांच्या संदर्भात त्यांनी ठोस असा कोणताही निर्णय अथवा एखाद्या घटनेला न्याय दिल्याचे दिसून येत नाही. त्यांच्या या निष्क्रिय कारभाराविरोधात एखाद्या पत्रकाराने लिखाण केले तर, त्यांच्या कार्यकर्त्यांकडून जीवे मारण्याची धमकी दिली जाते. लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारण्याचा नागरिकांना अधिकार आहे. माध्यमांना माध्यमांचे स्वातंत्र्य आहे. परंतु असे असताना आमदार कार्यकर्ते बातमीदारी करणाऱ्या पत्रकारास धमकीची भाषा करतात एवढेच नव्हे तर त्यांना दूरध्वनी करून अतिशय खालच्या भाषेत बोलतात.

या बाबत आपण केज तालुका प्रशासनामार्फत जिल्हा आणि राज्याकडे रीतसर तक्रार करणार आहोत. आपल्या जीवित काही धोका झालाच तर त्याला केज मतदार संघाच्या भारतीय जनता पक्षाचे आमदार नमिता त्यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा पती अक्षय मुंदडा आणि त्यांचा कार्यकर्ता जबाबदार असेल. अशी तक्रार पत्रकार रोहन गलांडे यांनी दिली आहे.

### आवाज दाबण्याचा प्रयत्न

केज मतदार संघात कोणी आमदार नमिता यांच्या विरोधात गेले तर त्यांचे सासरे नंदकिशोर नोंदला पती अक्षय मुंदडा आवाज दाबण्याचा प्रयत्न करतात. पोलीस प्रशासनावर दबाव आणून खोटी-नाटे गुन्हे दाखल करतात. अशा अनेक तक्रारी आहेत. आमदार हा नेहमी लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तत्पर असायला हवा. मात्र केजच्या आमदार नमिता लोकांच्या अडचणीत वाढ कशी होईल याची अधिक काळजी घेतात. त्यामुळे केज मतदार संघाचे होते वाटोळे झाले आहे असेच म्हणावे लागेल.

## बीडमध्ये रिपाइंचा सत्कार सोहळा!

नरेश पिव्हाळ: वाल्मिकी बांधव ताकदिनिशी सामील



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने रामदास आठवले यांचा भव्य सत्कार बीड शहरात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आयोजित करण्यात आला आहे.

या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वाल्मिकी समाज बांधवांची पेठ बीड विभागातील बतारवेस या ठिकाणी वाल्मिकी समाज बांधवांच्या उपस्थितीत मंगळवार (दि.३०) ऑक्टोबर रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीस राजू जोगदंड, किसन तांगडे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड आदी उपस्थित होते.

रामदास आठवले यांच्या बीड शहरातील भव्य सत्कार सोहळ्याचे औचित्य साधून शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरातील राजुरीवेस पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात येणाऱ्या भव्य रॅलीत पान २ वर...

## कवडगाव झेडपी शालेय समितीची निवड

अभिनंदनिय: अध्यक्षपदी शेरु पटेल तर उपाध्यक्षपदी परमेश्वर काळे

वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव येथे जि.प.शाळा ७ वी पर्यंत असून या शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षपदी शेरूभाई पटेल तर उपाध्यक्षपदी परमेश्वर काळे यांची चिट्टी काढून निवड करण्यात आली आहे.

सविस्तर वृत्त असेकी वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील जि.प. शाळा सातवी पर्यंत असून या शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष सह सदस्यांच्या निवडी करण्यात आल्या यामध्ये सर्वच सदस्य बिनविरोध करण्यात आले व अध्यक्ष आणि उपाध्यक्ष या पदासाठी सर्वच जण उत्सुक असल्या मुळे ही प्रक्रिया चिट्टी काढून ड्रॉ पद्धतीने करण्याचे ठरवले यामध्ये ज्याच्या नावाची चिट्टी निघेल तो अध्यक्ष व उपाध्यक्ष करण्यात येईल असे ठरविण्यात



आले यामध्ये अध्यक्षपदासाठी शेरू भाई पटेल यांच्या नावाची चिटी निघाली तर उपाध्यक्षपदी परमेश्वर काळे यांच्या नावाची चिट्टी निघाली या चिट्या शाळेतील लहान मुलीच्या हस्ते काढण्यात आल्या यामुळे कवडगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी शेरू भाई पटेल व उपाध्यक्षपदी परमेश्वर काळे यांची निवड करण्यात आली तसेच शाळेच्या सदस्य पदी साळवे कविता.चौरे प्रियंका. राऊत दिनेश. साळुंके अनिता. चांभारे गंगा.परांडे बाबासाहेब. शेख अनवर.यांच्या सदस्य पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी गावचे सरपंच बशीर भाई शेख उपसरपंच अंगत काळे माजी उपसभापती संदीपान खळगे ग्रा. पं.सदस्य बबन पान २ वर...

## बस-दुचाकीच्या अपघातात तरुणाचा मृत्यू

दुःखद: बस दुचाकीची समोरासमोर धडक




कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगरवरून काम उरकून गावाकडे परतणाऱ्या तरुणाच्या दुचाकीला वाघळूज परिसरातील कठीण वळणावर एसटी बसची धडक बसली. या अपघातात संदीप अश्रुबा आंधळे (वय-३०) रा. लिंबोडी ता. आष्टी या तरुणाचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी रात्री वाघळूज परिसरात घडली.

आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथील संदीप अश्रुबा आंधळे हा स्वतःच्या मालकीच्या टेम्पोचा हप्ता भरण्यासाठी सोमवारी दुपारी दुचाकीवरून नगरला गेला होता. तेथील दिवसभराचे काम उरकून तो रात्री दुचाकीवरून गावी परतत असताना नगर-बीड मार्गावरील वाघळूज येथील कठीण वळणावर अचानक समोरून येणाऱ्या कळंब -बोरवली या एसटी बसची संदीपच्या दुचाकीला धडक बसली. या भीषण अपघातात पान २ वर...

## राज्यात रिपाइं मजबूत करणार

दीपक निकाळजे : श्रीगोंद्यात सत्ता परिवर्तन निर्धार मेळावा

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी काळात राज्यामध्ये रिपब्लिकन पक्ष मजबूत करणार असून राज्यात मोठ्या प्रमाणात संघटन उभे करून राजकीय घडामोडीत भरीव कामगिरी करणार असल्याचे प्रतिपादन रिपाईचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक निकाळजे यांनी श्रीगोंदा येथील सत्ता परिवर्तन मेळाव्यात केलेबालाजी मंगल कार्यालय या ठिकाणी मोठ्या उत्साहात सत्ता परिवर्तन निर्धन मेळावा पार पडला. त्यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. दिपकभाऊ निकाळजे हे मेळाव्याचे अध्यक्षस्थानावरुन मेळाव्याला संबोधित करताना म्हणाले की अन्याय अत्याचाराच्या विरोधात जाहीर भूमिका घेऊन दिनदलित वंचित आदिवासी दिन दुबळ्या अन्यायग्रस्त घटकांना न्याय मिळवून देण्याचे काम इथून पुढे




पक्षमार्फत करणार असल्याचे त्यांनी नमूद केले पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष निलेश गायकवाड यांच्या हातून पक्षाचे पक्ष हिताचे व समाजाचे कार्य घडेल असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॉंग्रेस नेते मा.श्री.घनःशाम आण्णा शेलार व माजी जि.प.सदस्य मा.श्री. अनिल ठवाल, मुकुंद सोनटक्के, रावसाहेब हरिभाऊ पोडके, कांतीलाल कोकाटे, निशांत लोखंडे व इतर पदाधिकारी तसेच रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (-) चे महाराष्ट्र संपर्क प्रमुख मा. संतोषबापु गलांडे, महाराष्ट्र सचिव मा. अशोकजी ससाणे, केंद्रीय कार्यालय प्रमुख मा.तानाजी मिसळे, महाराष्ट्र संघटक मा. कैलासजी जोगदंड, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष मा.शशिकांत दारोळे, पुणे जिल्हा पान २ वर...

## गेवराई वकील संघाच्या निवडी

निवडणूक: अध्यक्षपदी अमित मुळे चौथ्यांदा विजयी

गेवराई पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई वकील संघाची निवडणूक प्रक्रीया आज (दि ३० सप्टेंबर ) रोजी पार पडली तसेच सकाळी दहा वाजता निवडणूकीसाठी मतदानाला सुरूवात झाली २१५ पैकी २०३ विधिज्ञ यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला तसेच विधिज्ञ अमित मुळे हे चौथ्यांदा या निवडणूकीत विजयी झाले आहेत तसेच विधिज्ञ सोमेश्वर कारके हे उपाध्यक्ष पदासाठी विजयी झाले तसेच विधिज्ञ प्रदिप मडके हे सचिव पदावर त्यांनी बाजी मारली आहे.

या बाबद सविस्तर माहिती अशी की,गेवराई न्यायालयात दरवर्षी वकील संघाची निवडणूक घेतली जाते तसेच जेष्ठ विधिज्ञ एस डी सानप या निवडणूकीचे निवडणूक अधिकारी होते तसेच आज सकाळी दहा वाजता या वकील संघाच्या मतदानाला सुरूवात झाली तसेच या निवडणूकीत अध्यक्ष पदासाठी विधिज्ञ अमित मुळे व विधिज्ञ रविंद्र एल गवारे




यांच्यात अध्यक्ष पदासाठी निवडणूक झाली तसेच विधिज्ञ अमित मुळे यांचा ४५ मतांनी विजय झाला आहे तसेच विधिज्ञ सोमेश्वर कारके व विधिज्ञ पी पी जरांगे यांच्यात उपाध्यक्ष पदासाठी लढत झाली यामध्ये विविज्ञ सोमेश्वर कारके हे ४ मतांनी विजयी झाले आहेत तसेच सचिव पदासाठी विधिज्ञ प्रदिप मडके व विधिज्ञ आर एच राठोड यांच्यात लढत झाली तसेच यामध्ये विधिज्ञ प्रदिप मडके यांचा २ मतांनी विजय झाला आहे तसेच संपुर्ण निवड प्रक्रीया ही जेष्ठ विधिज्ञ एस डी सानप यांनी पान २ वर...

## बीड विकासाचा खेळखंडोबा

दीपक काळे : जिल्हा समन्वयक यांचे सणसणीत प्रतिउत्तर

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून सत्ता भोगून बीड विकासाचा खेळ खंडोबा करणाऱ्या जयदत्त क्षीरसागर यांना सत्तेच्या मोहापुढे स्वतःचे पुतणे सांभाळता आले नाहीत त्या जयदत्त अण्णांच्या बगलबच्यांनी आम्हाला क्षीरसागरांनी न केलेल्या विकासाचे ज्ञान पाजाळू नये. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी बीड मतदार संघात अचानक सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम आयोजित करायचे त्यात स्वतःच्या संस्थेतील कर्मचारी गोळा करून विकासपुरुष म्हणून मिरवायचे आणि मतांची भीक मागायची असला भिकारचोट धंदा आजवर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांना कधी जमला नाही आणि यापुढेही ते कधी करणार नाहीत. जयदत्त अण्णा क्षीरसागर विकास मंचाच्या महिला आघाडी प्रमुख सौ.



जयश्रीताई विधाते यांनी अगोदर माजी मंत्री क्षीरसागरांनी बीड मतदार संघात जन्माला घातलेला विकास शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात घेऊन यावा म्हणजे निदान आम्हा शिवसैनिकांना तरी जयदत्त अण्णांच्या विकासाचे दर्शन घडेल व त्यानंतर मग आम्हाला देखील त्याचे अनुकरण करता येईल असे सणसणीत प्रतिउत्तर शिवसेना जिल्हा समन्वयक दिपक काळे यांनी जयश्रीताई विधाते यांनी केलेल्या टिकेला दिले आहे.

काल रोजी जयश्रीताई विधाते यांनी जयदत्त अण्णांच्या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे अनुकरण करूण्याऐवजी अण्णांनी केलेल्या विकसाचे अनुकरण केले असते तर बरे झाले असते अशी टिका अनिलदादा जगताप यांचे नाव न घेता केली होती व याबरोबर प्रत्येक कार्यक्रमात त्या आपल्या भाषणात वारंवार हीच टिका करत आहेत. याच टिकेला प्रतिउत्तर देण्याकारिता शिवसेनेच्या दीपक काळे यांनी पत्रक जाहीर करून जयश्रीताई यांचा चांगला समाचार घेतला आहे. या पत्रकात दिपक काळे यांनी पुढे म्हंटले आहे की, आजवर क्षीरसागर यांनी केवळ बीडकरांची दिशाभूल करून बीडच्या विकासाची पान २ वर...

## साबला येथे महाश्रमदान अभियान

उपक्रम : बीड झेडपीचे नियोजन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी ,

केज तालुक्यातील मौजे साबला येथे जिल्हा परिषद बीड यांच्या आदेशाने महाश्रमदान अभियान राबवण्यात आले . दि : ०१ ऑक्टोबर -२०२४ वार : मंगळवार रोजी सकाळी ठिक : ०६ वाजता . या महाश्रमदान अभियानाला सुरुवात करण्यात आली . या कार्यासाठी गावातील तरूण मित्रमंडळींनी स्वतः हून जास्त प्रमाणात सहभाग नोंदवला होता . गावातील प्रत्येक गल्लीतील रस्त्यावर झालेली घाण किंवा नालीमध्ये अडकलेले गवत तसेच प्रमुख रस्त्यावर तसेच नालीतील कचारा किंवा काही घाण पूर्ण पणे साफसफाई करण्याचे काम यावेळी करण्यात आले . यावेळी यामध्ये ग्रामविकास अधिकारी धनराज सोनवणे , आदर्श शिक्षक नरहरी काकडे , उपसरपंच पवन सरवदे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , ग्रामपंचायत सदस्य पोपट काकडे , मुख्यमंत्री युवा दुत पवन काकडे तसेच लक्ष्मण काकडे , जालींदर मुळे , रामदास मुळे , राहुल मुळे , दादा पांचाळ , आण्णा मस्के , राहुल घाडगे इत्यादींनी या महाश्रमदान अभियानात सहभाग घेतला होता .

**निर्णय** नगरसेवक ड.विकास जोगदंड न्यायालयात घेणार धाव

## मागासवर्गीयांनो तुमचा हक्काचा निधी वळविला!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अनुसूचित जाती समूहाच्या पाचवीला संघर्ष पूजलेला असून सहजा सहजी वंचीत,उपेक्षितांना काही मिळालं नाही त्यासाठी कायम लढावच लागलं समतेचे महामेरू भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानिक दृष्ट्या वंचीत उपेक्षितांच्या सर्वांगीण कल्याणसाठी संविधानिक तरतूद करत विकासाच्या मुख्य प्रवाहत आणले आहे परंतु जातीयद्वेषी मानसिकतेने बरबटलेले प्रशासन अनुसूचित जाती राखीव प्रभागाच्या जीवावर उठले आहे महाराष्ट्र राज्यातील नागरी क्षेत्रातील विशेष घटक लोकसंख्येच्या कल्याणासाठी राबवण्यात येणाऱ्या नागरी वस्ती सुधार योजनेच्या अंमलबजावणी करिता सन २०२४-२५ साठी बीड जिल्ह्यासाठी अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये पायाभूत सुविधा जसे की पाणी मलनिसारण जोड रस्ते अंतर्गत रस्ते समाज मंदिर इत्यादी विकास कामे या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध करून अनुसूचित जाती व नव बौद्ध घटकांच्या वस्तीचा सर्वांगीण विकास करणे हा सदर योजनेचा मुख्य उद्देश आहे परंतु या उद्देशाला पालिका व जिल्हा प्रशासन हरताळ फासत आहे

राखीव प्रभागात अनुसूचित जाती प्रभाग व स्थानिक नागरिकांच्या मागणी नुसार रस्ते,नाल्या व इतर अत्यावश्यक विकास कामे करणे साठी अंकी १०,५८,७१,३१८,अक्षरी :- १० कोटी ५८ लाख ७१ हजार ३१८ रु निधी उपलब्ध झाला असून नगर परिषद बीड



यांनी तात्काळ प्रस्ताव दाखल करणे बाबत संदर्भ क्र १ नुसार मा जिल्हाधिकारी बीड यांनी आदेशित केले होते अनुसूचित जाती राखीव प्रभाग क्र ३ (अ) प्रभाग क्र ४ (अ) प्रभाग क्र १३ (अ) प्रभाग क्र २२ (अ) प्रभाग क्र २४ या पाच प्रभागाचे प्रतिनिधित्व करणारे माजी नगरसेविका, नगरसेवक यांनी राखीव प्रभागातील माता, भगिनीं, बांधवांच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार नगर परिषद बीड यांना रस्ते व नाली सह आदी विकासकामे प्रस्तावित करणे संदर्भात पत्रद्वारे मागणी करत अनुसूचित जाती राखीव प्रभागात समान रित्या निधी वितरित करणे बाबत दिनांक ०८/०८/२०२४ तसेच १२/०८/२०२४ रोजी मागणी निवेदन देण्यात आले आहे राखीव प्रभागाच्या वाट्यास कायम उपेक्षा आली असून राखीव प्रभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संदस्यांना निधी साठी मोठा संघर्ष करावा लागत आहे

२०२४-२५ या वर्षी बीड नगर परिषद प्रशासनाने लोकशाहीर पान २ वर...

## आदर्श शिक्षक पुरस्कार झाला गौरव

दखल:विठ्ठल मगर यांचे होतेय अभिनंदन

वडवणी/पुण्यभुमी प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील पिंपरखेड येथील माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले सहशिक्षक विठ्ठल मगर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला आहे. देवडी येथील रहिवासी असलेले विठ्ठल भगवानराव मगर हे मागील २३ वर्षापासून पिंपरखेड येथील माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक म्हणून काम करतात. या कालावधीत त्यांनी शाळेच्या विज्ञान विभागाची जबाबदारी चोख बजावत शाळेला शेकडो बक्षिसे मिळवुन दिले.

यांनी सादर केलेल्या प्रयोगांना तालुका, जिल्हा, विभागीय पातळीवरच नाही तर राज्य




पातळीवर देखील पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांचा नामांकित मंडळी कडून वेळोवेळी गौरव झालेला आहे. या सर्व कामाची दखल घेऊन मानवविकास सेवाभावी संस्था व माऊली नागरी पतसंस्था माजलगाव यांच्या तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना देण्यात आला. पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. दत्तात्रय वाळसकर आणि मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. पान २ वर...